१०२ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवा काळ

• पुणे, गुरुवार १४ नोव्हेंबर, २०२४ • वर्ष-४, अंक-५८, पाने-८, किंमत : ₹ ६ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Issue - 58, Vol.- 4 Marathi - Daily - Pune, 14 November, 2024 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## ‘सीआयएसएफ’मध्ये महिलांची बटालियन

**नवी दिल्ली -** केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाच्या (सीआयएसएफ) इतिहासात पहिल्यांदाच केवळ महिलांचा समावेश असलेल्या बटालियनला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. या पहिल्या वहिल्या महिला बटालियनमध्ये १ हजार २५ महिला असणार आहेत. याला रिझर्व्ह बटालियन असे नाव देण्यात आले आहे. सीआयएसएफ हे देशातील एक अद्ययावत असे सुरक्षा दल आहे. सीआयएसएफकडे अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची सुरक्षा, विमानतळांची सुरक्षा तसेच अत्यंत महत्त्वाच्या संरक्षणविषयक संस्थांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपविली जाते. आतापर्यंत या दलामध्ये स्वतंत्र महिला बटालियन नव्हती.




# भाजपाच्या ‘बुलडोझर मुख्यमंत्री’ ना दणका बुलडोझर फिरवणे बेकायदा! कोर्टाचा निकाल

■ नवी दिल्ली



**‘बुलडोझर मुख्यमंत्री’ म्हणून दहशत निर्माण करणारे भाजपाचे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना आज सर्वोच्च न्यायालयाने जबरदस्त झटका दिला! सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला की, आरोपी असो नाहीतर गुन्हेगार, नोटीस न देता बुलडोझर फिरवणे पूर्ण बेकायदेशीर आहे. इतकेच नव्हे तर जे अधिकारी अशी बेकायदेशीर कारवाई करतील त्यांच्याकडून नुकसानीची वसुली केली जाईल.**

**योगी** आदित्यनाथ यांनी सुरू केलेल्या आणि त्यानंतर भाजपाशासित मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये पसरलेल्या ‘बुलडोझर राज’ला आज सर्वोच्च न्यायालयाने चांगलाच दणका दिला. कोणत्याही व्यक्तीचे घर १५ दिवसांची पूर्वसूचना दिल्याशिवाय बुलडोझरने पाडता येणार नाही, असे न्यायालयाने ठणकावून सांगितले.

उत्तर प्रदेशमध्ये मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अल्पसंख्याक समुदायाला लक्ष्य करीत त्यांची बांधकामे अनधिकृत ठरवून २४ तासांत त्यावर बुलडोझर चालविण्याचा धडाका लावला होता. या कारवाईच्या विरोधात अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. या याचिकांवर आज न्या. भूषण गवई यांच्या खंडपीठाने निकाल दिला. गेल्या १ ऑक्टोबरला त्यांनी सुनावणी पूर्ण करून निकाल राखून ठेवला होता.

न्यायालयाने निकालात म्हटले की, देशाच्या राज्यघटनेने प्रशासन आणि न्यायपालिका यांचे कार्यक्षेत्र निश्चित केले आहे. दोन्ही यंत्रणांनी आपापल्या कार्यकक्षेत राहूनच काम करणे घटनेला अपेक्षित आहे. न्याय देण्याचे काम न्यायपालिकेचे आहे. ते काम प्रशासनाने करणे म्हणजे कायदा स्वतःच्या हातात घेण्यासारखे आहे. प्रशासनाचे काम न्यायपालिकेने दिलेल्या निकालांची अंमलबजावणी करणे हे आहे. प्रशासनाने न्यायपालिकेचे काम करता कामा नये. एखादा व्यक्ती केवळ आरोपी आहे म्हणून त्याचे घर प्रशासन तोडणार असेल तर ते बेकायदा आहे. घटनेच्या कार्यक्षेत्रांच्या विभाजनाच्या तत्वाला हरताळ फासणारे आहे.

सरकारी अधिकारी कोणाही व्यक्तीला दोषी ठरवू शकत नाहीत. न्यायाधीशांचे काम त्यांनी करता कामा नये. एखादा आरोपी न्यायालयात दोषी आढळला तरीदेखील कायदेशीर नोटीस न देता त्याचे घर पाडणे बेकायदेशीर ठरते. निवासाचा अधिकार हा घटनेने सर्व नागरिकांना दिलेला एक मौल्यवान अधिकार आहे. कोणाही व्यक्तीला या अधिकारापासून वंचित ठेवणे घटनेचे उल्लंघन ठरते. घर हे फक्त एका व्यक्तीचे नसून संपूर्ण कुटुंबाची आश्रयस्थान » पान ७ वर

# देशमुखांना क्लीनचिट नाही! फडणवीस टार्गेट निवडणूक काळात न्या. चांदिवाल का बोलले?

**विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत एकमेकांना उघडे पाडण्यासाठी नेते मंडळी वाट्टेल त्या थराला जात आहेत. जोरदार चिखलफेक सुरू आहे. या चिखलफेकीत आज माजी न्यायाधीश चांदिवालही उतरले. मविआ सरकारच्या काळात तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर झालेल्या १०० कोटी रुपयांच्या खंडणी वसुली प्रकरणाची चौकशी करणारे चांदिवाल यांनी आज दोन वर्षांनी थेट मुलाखत देत गोपनीय गोष्टी उघड केल्या. यामुळे मविआला धक्का बसावा हे यामागचे नियोजन आहे असे वाटते.**



■ मुंबई

**ते म्हणाले** की, या अहवालात मी देशमुख यांना क्लीनचिट दिलेली नाही, सचिन वाझे आणि अनिल देशमुख यांनी या प्रकरणात देवेंद्र फडणवीस यांना गुंतवण्याचा प्रयत्न केला होता, वाझेने शपथपत्रात शरद पवार आणि अजित पवार यांचे नाव घेतले होते, पण त्याचा पुरावा मिळाला नाही, परमवीरसिंग यांनी ऐकीव माहिती दिली. अनिल देशमुख यांच्या मुलाने ४० लाख रुपयांबाबत वाझेला मेसेज पाठवला होता तो मी पाहिला अशी सर्व पुरावा नसलेली त्यांना मिळालेली गोपनीय माहिती चांदिवाल यांनी उघड केली.

वास्तविक चांदिवाल यांचा २०२२ सालचा अहवाल मविआ किंवा महायुती सरकारने अद्याप सार्वजनिक केलेला नाही. असे असताना या गोपनीय माहिती स्वतः न्यायाधीश राहिलेले चांदिवाल यांनी उघड केली. पुरावे नसल्याने त्यांनी यातील अनेक गोष्टी अहवालात नमूद केलेल्या नाहीत, पण मुलाखतीत सांगितल्या. या गोष्टी मविआसाठी घातक आहेत. त्यामुळे त्यांच्या हेतूबद्दल संशय व्यक्त केला जात आहे.

न्या. चांदिवाल यांनी चौकशी सुरू झाल्यापासून आपली पदोपदी कशी अडवणूक करण्यात आली याचा पाढाच वाचला. ते म्हणाले की चौकशी सुरू केल्यापासून माझ्यासमोर अनेक अडचणी येत होत्या किंवा आणल्या जात होत्या. पोलीस आणि सरकारी अधिकारी सहकार्य करत नव्हते. साक्षी पुरावे माझ्यासमोर आणलेच जात नव्हते. तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी केलेले बहुतांश आरोप ऐकीव स्वरुपाचे होते. त्यांना माझ्यासमोर हजर करा असे मी वारंवार पोलिसांना सांगितले. पण ते बेपत्ता झाले आहेत, असे उत्तर सीआयडी देत होती. सचिन वाझे यांच्याकडे बरीच माहिती होती. मात्र » पान ७ वर

## शिवाजी पार्क व खारघरमध्ये नरेंद्र मोदींची आज सभा

■ नवी मुंबई

**रायगड,** ठाणे शहर आणि नवी मुंबईतील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दादरच्या शिवाजी पार्कवर आणि खारघर सेक्टर २९ मधील सेंट्रल पार्कजवळील मैदानात जाहीर सभा होणार आहे. या सभांसाठी भाजपा पदाधिकाऱ्यांची तयारी पूर्ण झाली आहे. या दोन्ही सभांसाठी भव्य व्यासपीठ उभारण्यात आले आहे. नरेंद्र मोदी यांच्यासाठी खारघर येथील पेठपाडा मेट्रो रेल्वे स्थानकाच्या बाजूला हेलिपॅड उभारण्यात आले आहे.

## इंदिरा गांधी स्वर्गातून आल्या तरी ३७० कलम पुन्हा आणू शकणार नाही

■ बुलडाणा



अमित शहा यांचा राहुल गांधींवर हल्लाबोल

**विधानसभा** निवडणुकीच्या प्रचारासाठी आज दुपारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सिंदखेडमध्ये प्रचारसभा घेत राहुल गांधी यांच्यासह काँग्रेसवर जोरदार प्रहार केला. या सभेत अमित शहा म्हणाले की, काश्मीरचे ३७० कलम पुन्हा आणणार असल्याचे राहुल गांधी म्हणत आहेत. मी आज सांगतो की, इंदिरा गांधी स्वर्गातून आल्या तरी त्या काश्मीरचे ३७० कलम पुन्हा आणू शकणार नाहीत.

अमित शहा म्हणाले की, काँग्रेसवाले एसटी, एससी, मागासवर्गीय लोकांच्या विरोधात आहेत. नरेंद्र मोदी यांनी आदिवासी महिलेला राष्ट्रपती बनवले. केंद्रीय मंत्रिमंडळात ४७ टक्के मागासवर्गीय, एसटी, एससी सदस्य आहेत. मुस्लिमांना आरक्षण देणार असल्याचे राहुल गांधी वारंवार सांगत आहेत. ते एससी, एसटी आणि ओबीसींचे आरक्षण कमी करून मुस्लिमांना आरक्षण देणार आहेत. यासाठी तुम्ही सहमत आहात काय? » पान ७ वर

## राज्यात बॅग तपासणीचा धडाका नेत्यांच्या सामानात चकली, भेळ

■ मुंबई

**उबाठाचे** प्रमुख उद्धव ठाकरेंच्या हेलिकॉप्टरमधील बॅगांची निवडणूक अधिकाऱ्यांनी मागील सलग २ दिवस तपासणी केली होती. दोन्ही घटनांचे व्हिडीओ उद्धव ठाकरेंनी सोशल मीडियावर पोस्ट करत मोदी, शहांच्या बॅगा तपासल्या जातात का? मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या बॅगांची तपासणी होते का? असे प्रश्न विचारले होते. त्यानंतर आज मुख्यमंत्र्यांसह दोन उपमुख्यमंत्र्यांच्या बॅगांच्या तपासणीचे व्हिडीओ समोर आले. त्यामुळे येत्या काही दिवसांत सत्ताधाऱ्यांकडून बॅगा तपासणीचे व्हिडीओ येतील, आणि आमच्या बॅगेत काही नाही हो. फक्त मारी बिस्किट आणि खारी बिस्किट हेच दाखवणार हे ठाकरेंचे भाकित २४ तासांत खरे ठरले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बॅग तपासणीचा व्हिडिओ आज भाजपाने व्हायरल करून उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली की, ७ नोव्हेंबरला » पान ७ वर

## झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यासाठी ६४ टक्के उत्साही मतदान

■ रांची

**झारखंड** विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी आज उत्साही मतदान झाले असून, संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ६४ टक्के मतदान झाले. झारखंडमधील पहिल्या टप्प्यातील या मतदानात ६८३ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. झारखंड विधानसभा निवडणुकीची घोषणा महाराष्ट्राच्या निवडणुकीबरोबर झाली होती. झारखंडमध्ये १३ व २० नोव्हेंबर असे दोन टप्प्यांत मतदान होणार असून, आज १५ जिल्ह्यातील ४३ मतदारसंघांसाठी पहिल्या टप्प्याचे मतदान झाले. सकाळी ७ वाजल्यापासूनच लोकांनी मतदानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पहिल्या टप्प्यातील प्रमुख उमेदवारांमध्ये माजी मुख्यमंत्री » पान ७ वर

## दिल्ली उच्च न्यायालयाकडून जगदीश टायटलर निर्दोष मुक्त

■ नवी दिल्ली

**काँग्रेस** नेते व माजी खासदार जगदीश टायटलर यांना दिल्ली उच्च न्यायालयाने २००९ सालच्या एका फसवणुकीच्या प्रकरणातून निर्दोष मुक्त केले आहे. बनावट पत्राच्या आधारे चिनी टेलिकॉम कंपनीच्या अधिकाऱ्यांना व्हिसामध्ये सूट देण्यात आल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. या प्रकरणी व्यावसायिक अभिषेक वर्मा यांनाही न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे. राऊज एव्हेन्यू न्यायालयाच्या न्यायमूर्ती कावेरी बावेजा यांनी हे आदेश दिले.

## शरद पवारांचे फोटो, व्हिडिओ वापरू नका! अजित पवार गटाला कोर्टाचे निर्देश

■ नवी दिल्ली

**शरद** पवारांचे फोटो, व्हिडिओ वापरू नका अशा सूचना कार्यकर्त्यांना द्या, स्वतंत्र पक्ष म्हणून निवडणूक लढा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला आज दिले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या निवडणूक चिन्हाबाबत न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी पार पाडली. शरद पवार गटाकडून अजित पवार गटाचे घड्याळ चिन्ह गोठवून घड्याळाऐवजी दुसरे चिन्ह द्यावे, अशी मागणी



केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने या मागणीला नकार दिला. त्याऐवजी सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला एक इलेक्ट्रॉनिक परिपत्रक काढण्याचे निर्देश दिले. या परिपत्रकात तुमचे उमेदवार आणि कार्यकर्त्यांना शरद पवारांचे फोटो आणि व्हिडिओ वापरू नका, आम्ही दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करा. सगळ्या ठिकाणी हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, असा मजकूर लिहा, अशा सूचना द्या, असे सांगितले. » पान ७ वर



# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

सिक्युरिटी गार्ड, हाऊसकिपिंग / सुपरवायझर, एरिया ऑफिसर, जेन्टस, लेडीज, पेंट्रीबॉय, इलेक्ट्रिशन प्लंबर, MST. वरळी, दादर, भायखळा, गोवंडी, माटुंगा, जोगेश्वरी, बोरीवली **8291056761 / 8422880513** {NC243074}

संपूर्ण मुंबईमध्ये सुरक्षा गार्डसाठी पुरुष, महिला अर्जंट पाहिजेत. पगार 21500-28500 अंधेरी (ईस्ट), **9819544186** {NC242986}

हेल्थकेअर कंपनीमध्ये हेल्पर, पॅकिंगसाठी महिला आणि पुरुष, मुली आणि मुले पाहिजे शिक्षण वयाची अट नाही संपर्क:- **7738372055/ 7506121314 SALARY 19900** {NC243051}

मुंबई, ठाणेमध्ये घरी पेशंट सांभाळण्यासाठी आया, नर्से स वॉर्डबॉयची गरज आहे. - **9136792832, 8291152695** {NC243076}

दादर, P Square Pest Control मुले/मुली पाहिजेत. **9820548338/ 9167952766** {NC243052}

सुकुटुंबात 24 तास घरकामासाठी (वय 18-30) मुली/बायका पाहिजेत. पगार 15000/- पनवेल **09867104691** {NC243111}

आश्रममध्ये कामासाठी पुरुष/महिला पाहिजेत. राहणे-खाणे फ्री, पगार 6000 - 9000. मीरारोड / पनवेल - **8779694066** {NC243135}

बालाजी पेस्ट कंट्रोल कंपनीसाठी अनुभवी टेक्निशियन हवेत 15000/- कांदिवली पश्चिम : **9769723512** {NC243138}

Rangeela Art Jewellery LLP 252/258 Zaveri Bazar Opp. TBZ Mumbai - 02. इमिटेशन ज्वेलरी पॅकिंगसाठी मुली पाहिजे. Mob. No. - **9820206978** {NC243127}

R. Chie Creation Ghatkopar (West), 86. टेली मार्केटिंगसाठी B.com मुली पाहिजेत. **9619432424 / 9821120375** {NC243128}

## पाहिजेत

हाऊसकिपिंग कंपनीकरिता अंधेरी आणि विक्रोळीयेथे हाऊसकिपर स्टाफ पाहिजेत. ड्युटी 8 तास. 4 फोटो, शाळेचा दाखला, बायोडाटासह भेटा - 102, यश विलोज, डीसीबी बँकेच्यावर, आरे रोड, गोरेगाव (पूर्व), फोन - **8652222020 / 9870907743.** {NC243130}

(24 तास) घरकामासाठी, बेबीकेअर, कुकींगसाठी अनुभवी "बायका/मुली" पाहिजेत. पगार (18,000-40,000) रंजीतसर **9321417007 / 9892575886** {NC243129}

कॉरुगेशन कॉन्ट्रॅक्टर ऑफसेट प्रिंटर, लॅमिनेशन ऑपरेटर, मार्केटिंग, हेल्पर्स उल्हासनगरसाठी पाहिजेत. **9323258222** {NC243094}

**पाहिजेत**
**स्मार्ट लेडीज**
**नवीन ऑफिससाठी पाहिजेत**
**ऑफीस असिस्टंट**
पगार- १२,०००/- ते २०,०००/- शिक्षण १२वी, ग्रॅज्युएट, वय २० ते ३० वर्षे, कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक.
**असिस्टंट मॅनेजर**
पगार- २५,०००/- ते ४५,०००/- इंग्लिशमध्ये बोलण्याचे ज्ञान आवश्यक. (फ्ल्युंट इंग्लिश) शिक्षण १२वी, ग्रॅज्युएट, वय २२ ते ३० वर्षे कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. कागदपत्रासह भेटा
**कामोठे, पनवेल**
**मो.- 7397969039**

HDFC बँकेत मुले मुली पाहिजेत पगार 17500-35500 डायरेक्ट भरती. संपर्क **9067849017** {NC243161}

कुरियर कंपनीला अंधेरी वेस्ट एरियाच्या डिलिव्हरीसाठी 10 डिलिव्हरीबॉईज पार्टटाईम/फुलटाईम पाहिजे. **9029013015 / 9029013014** {NC243156}

असिनपॉवर प्रा. लि. ठाणे (इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टींग कंपनी) एक्सेल ऑफिसर/ऑटोकॅड ऑपरेटर (इलेक्ट्रिकल-प्लॅनिंग/डिझायनिग) मोबाईल - **7208891132** {NC243153}

## पाहिजेत

बिस्किट फॅक्टरीसाठी मुलगे आवश्यक आहेत. वेळ 10 ते 6 संपर्क : **9821025289** {NC243174}

**पाहिजेत**
**नवीन पनवेल येथे अॅग्रो टुरिझम फार्मसाठी किचन सांभाळू शकणारे, घरगुती महाराष्ट्रीयन मालवणी / गोवन पद्धतीचे जेवण बनवता येणारे कुशल जोडपे पाहिजे. राहण्याची आणि जेवणाची सोय केली जाईल. जोडप्यासाठी पगार २५०००/-. संपर्क साधा :-**
**9702240675**
**8879863981**

वरळी, दादर, बांद्रा करिता मोठ्या संख्येने ड्रायव्हर तसेच सायन-माटुंगा करिता स्वीपर्स, हाऊसकिंपीग, सुपरवायझर त्वरित पाहिजेत. संपर्क : **9082772768 / 9867957361** पत्ता : शार्प - सर्व्हिसेस - 202/2 राजगीर अॅनेक्स, लक्ष्मीबाग, सायन ब्रीजखाली, सायन वेस्ट. {NC243178}

बॅटरी डिलिव्हरी करिता दुकानात मुलगा/माणूस पाहिजे. राहण्याची जेवणाची सोय, विरार-वेस्ट **9561268446** {NC243185}

तात्काळ आवश्यकता आहे स्मार्ट आणि हुशार, संभाषण कौशल्यांसह FEMALE OFFICE ASSISTANCE FOR MIRA ROAD परिपक्व उमेदवार किमान पात्रता HSc त्वरित कॉल करा. Sapna **9136117899** {NC243192}

24तास घरातील सर्व कामांसाठी (बाई) आवश्यक आहे. कोपरखैरणे **9769452749** {NC243197}

SBI बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भर्ती. 15000/- ते 35,000/- **9702279241** {NC242983}

रिसेप्शनीस्ट, अकाऊंटंट, बाइंडर, हेल्पर, पंचींग ऑपरेटर, बॉयलर, फिडरमन पाहिजेत. संपर्क- **9870199683** {NC243064}

माऊथ फ्रेशनर (FMCG) कंपनीत मुंबईमध्ये मार्केटींगसाठी सेल्समेन पाहिजेत. अनुभवी-बिनअनुभवी. (पगार 15,000/- ते 25,000/-) संपर्क करा: **9372465089** {NC243055}

पुणे इथे हेडलबर्ग 28x40, 4 कलर व 2 कलर प्रिंटिंग मशीनवर बॉलर, फिडरमॅन, पाहिजेत. पुणे शिवाजी नगर **9822352233** {NC243106}

अंधेरी येथे ऑफिसमध्ये पार्टटाईम हेल्पर पाहिजे. पगार 9000 फोन - **9029985564** {NC243133}

प्रिंटिंग प्रेसमध्ये 4 कलर कोमोरी ऑटो प्लेट मशिन प्रिंटर, पंचिग ऑपरेटर, बॉयलर, कटिंग मशीन ऑपरेटर आणि 2 कलर मशिन UV, ड्रिप ऑफसाठी प्रिंटर, DTP ऑपरेटर पाहिजेत. पत्ता : गाला 48, ओल्ड रामगोपाल इंडस्ट्री, जव्हार टॉकीजजवळ, मुलुंड (वेस्ट), मोबाईल - **8369903933, 9920417031** {NC243201}

ऐरोली, येथे गृहनिर्माण संस्था संबंधित कामे आणण्यासाठी मुले पाहिजेत. अनुभवींना प्राधान्य वयाची अट नाही संपर्क - कृष्णा हौ सोसायटी डी मार्ट समोर - **9867467386 / 9136110506** {NC243200}

लोडर आणि हेल्पर पाहिजेत. अंधेरी साकीनाका करीता. मोबाईल. संपर्क - **9920807745** {NC243199}

## पाहिजेत

पंचिंग ऑपरेटर आणि हायडलबर्ग ऑफसेटसाठी बॉयलर आवश्यक आहे. मनीष पॅकेजिंग **9689118911** उल्हासनगर {NC243203}

हाऊसकिपिंग / पॅकिंग / जिम ट्रेनरसाठी मुले /मुली पाहिजे. (पगार 14500/- संपर्क: **9820259250 / 9987046265** {NC243204}

मुलुंड पश्चिम येथे पार्लरसाठी ब्युटिशियन पाहिजे. संपर्क : **9769452749** {NC243205}

प्रिंटिंग प्रेसमध्ये कोमोरी मशीनसाठी फिडरमन आणि बॉयलर पाहिजेत. महापे, नवीमुंबई - **9820614018** {NC243206}

## Situation Vacant

Required DTP Operator and Accounts Assistant at Malad. Interested Candidates may contact on **9762733167.** {NC243198}

REQUIRED MALE OFFICE ASSISTANT KNOWING ENGLISH AND KNOWLEDGE OF COMPUTERS FOR OFFICE MAHIM **9323206572** {NC243202}

Required 12th pass female candidate for office telemarketing & Digital marketing work with computer knowledge 1-2 year experience in marketing at Ansa Industrial estate, Sakinaka Andheri East. Age - 30-40 years Language known - English, Hindi, Marathi, Gujarati Salary - 15000 - 17000. Timing - 9:30 - 6:00pm Send resume amitfusi1993@gmail.com **9820608833** {NC243207}

## व्यवसायविषयक

महिला/मुलींना महिन्याला 30000 रुपये कमवून देणारा ज्वेलरी बिजनेस **7738657263** {NC242942}

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे अग्रीमेंट - **9028160157** {NC243104}

यशस्वी उद्योजक बना. दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा दादर- **9967437950** विरार- **8652643434** {NC243049}

आमची कंपनी आपल्याला शिकता शिकता रोज नफा मिळवून देते व जागतिक व्यवसायामध्ये प्रगतशील व्यवसायिक बनवते वयाची अट नाही. संपर्क-**8433763192 / 8452037238** {NC243134}

## लॉटरी विषयक

रोजच सर्व लॉटरींना फिक्स 10 जोडी फॉलो 100% विनिंग लाईफटाईम **8828693308** {NC243137}

## वर पाहिजे

वधु-28, 12वी मुलांचे क्लासेस चालवते. 10,000/- आई-वडील नाहीत. आजी आजोबांकडे राहते. आजीची प्रकृती ठिक नसल्यामुळे त्वरित विवाह अपेक्षा समजुतदार, कष्टाळु मुलगा हवा. जातीची/वयाची अट नाही. **8983174198** {NC243135}

**वाचकांना सूचना**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
- **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# राशीभविष्य

गुरुवार, दि. १४ नोव्हेंबर २०२४
संजय मनोहर

**मेष** आपल्या बोलण्याने इतरजन दुखवले जाणार नाही, याची काळजी घ्यावी. उधारीवसूलीचे प्रयत्न यश देतील. प्रेमसंबंधात कटुता येणार नाही, म्हणून सावध राहावे.

**वृषभ** बिघडलेले संबंध सुधारण्याचा प्रयत्न यश येईल. व्यवसायात अपेक्षित फायदा होईल. कौटुंबिक समस्या सोडवता येतील.

**मिथुन** इतरांशी सौजन्याने वागणे आवश्यक राहील. गैरसमजूतीतून मनस्ताप होईल. वाचन, श्रवण, पठण मानसिक बळ वाढविण्यास उपयोगी ठरेल.

**कर्क** पेलेल तेवढी जबाबदारी घ्यावी. चारचौघांच्या मानाने आपण सुखी आहोत, ही धारणा सुखावेल. नोकरीत कामाच्या ठिकाणी मन गुंतून ठेवणे गरजेचे राहील.

**सिंह** लहानसहान कामे पार पडण्यासाठी बराच वेळ व शक्ती खर्ची वाया घालवावी लागेल. पालकांच्या तब्येतीची काळजी घ्यावी.

**कन्या** आर्थिक नियोजनाने विवंचना कमी होईल. अधिक व्यवहारी होणे टाळावे. प्रयत्नांचा वेग वाढवावा लागेल.

**तूळ** समोरच्याची मानसिकता ओळखून आपले मत द्यावे. नव्याने केलेली गुंतवणूक फायद्याची राहील. मुलांना त्यांच्या चुकीची जाणीव होईल.

**वृश्चिक** राहत्या घराचे प्रश्न मार्गी लागतील. खरेदी भान ठेवून करावी. नोकरीची संधी मिळण्याच्या दृष्टीने अनुकूलता राहील.

**धनु** मित्रांसाठी खर्च करावा लागेल व संवाद गरजेचा असेल. अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेणे आवश्यक राहील. स्वतःचे स्थान टिकवून ठेवण्याला प्राधान्य द्यावे.

**मकर** भावाबहिणींच्या अडचणी सुटतील. मनाजोगती खरेदी करू शकाल. निर्णय घेणे अवघड होईल.

**कुंभ** घरात आनंद व समाधान देणाऱ्या गोष्टी घडतील. प्रवासावर खर्च भर होईल.

**मीन** महत्त्वाच्या बैठका यशस्वी होतील. देवदर्शनानिमित्त प्रवास घडेल.

# आमचा पक्ष सर्वधर्मसमभावाचे समर्थन करतो
# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे वक्तव्य

■ पाथरी

आमचा पक्ष सर्वधर्मसमभावाचे समर्थन करणारा आहे असे विधान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. पाथरी विधानसभा मतदारसंघातील अजित पवार गटाचे उमेदवार राजेश विटेकर यांच्या प्रचारार्थ अजित पवारांनी आज सभा घेतली. यावेळी त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. अजित पवार म्हणाले की,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिव, शाहू, फुले व आंबेडकर यांच्या विचाराने कार्य करणारा पक्ष आहे. तर काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा २ वेळेस पराभव केला होता. मात्र आता त्यांना पुळका आहे, असे नाटक करत आहे. जातीयवाद करून आतापर्यंत कोणत्याही पक्षाचे भले झालेले नाही. सर्व धर्मातील नेत्यांना आम्ही उमेदवारी दिली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाने १० टक्के जागा मुस्लीम समाजाला, १२.५ टक्के जागा मागासवर्गीयांना, १० टक्के जागा महिलांना व १२.५ टक्के जागा आदिवासी समाजासाठी देऊन सामाजिक अभिसरण अंमलात आणले आहे. अल्पसंख्याक समाजासाठी १ हजार कोटींची व इतर सर्व समाजासाठी महामंडळाच्या माध्यमातून तरतुदी केल्या आहेत.

# उभे करायला अक्कल लागते उद्ध्वस्त करायला लागत नाही

■ शिर्डी

शिर्डी विधानसभा मतदारसंघात झालेल्या सभेत शरद पवारांनी नाव न घेता

**विरवेंच्या गडात पवारांची फटकेबाजी**

विखे पाटलांच्या नेतृत्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण केले. शरद पवार म्हणाले की, नगर जिल्ह्यातील काही लोक मला भेटले होते. त्यांनी या ठिकाणी प्रचंड दहशत आणि दडपशाही असल्याचे सांगितले. ही लोकशाही आहे. लोकशाहीमध्ये जर कोणी दहशत आणि दडपशाही वापरत असेल तर ती उद्ध्वस्त करण्याची ताकद तुमच्यात आहे. इथल्या दहशतवादाला घाबरू नका. हिंमत असेल तर समोरासमोर लढा. कुठे पोस्टर फाड, कुठे बॅनर काढ अशी कामे करणे सोडा. उद्ध्वस्त करण्यासाठी अक्कल लागत नाही.

# मुरबाड ग्रामीण रूग्णालयात ५ बेडचे डायलेसिस सेंटर सुरु

■ मुरबाड

मुरबाड ग्रामीण रूग्णालयात आजपासून अत्याधुनिक तंत्रज्ञान युक्त असे ५ बेडचे डायलेसिस सेंटर सुरू करण्यात आले.. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे. सेंटर सुरू होत असल्याची माहिती मुरबाड ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ संग्राम डांगे यांनी दिली. रुग्णालयात सुरू करण्यात आलेले डायलेसिस सेंटर हे अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असून, या ठिकाणी एकावेळी ५ रुग्णांना उपचार घेणे सहज शक्य होणार आहे. रूग्णालयात सुरू झालेल्या डायलेसिस सेंटरमुळे मुरबाड व तालुक्यातील रुग्णांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे. रुग्णालयातील डायलेसिस सेंटर मध्ये मोफत डायलेसिस होणार असून या विनामूल्य असल्याचे डांगे यांनी सांगितले.

# पाटणमध्ये रविवारी उद्धव ठाकरेंची सभा

■ कराड

**सध्या** विधानसभा निवडणुकीमुळे राज्यभरात प्रचार सभांनी चांगलेच वातावरण तापले आहे. राजकीय पक्षातील वरिष्ठ नेते मंडळी मतदारसंघात सभा घेऊन आपल्या विरोधकांवर निशाणा साधत आहेत. दरम्यान, नुकतेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते तथा खासदार संजय राऊत यांनी मुंबईत पाटण विधानसभा मतदार संघाचे उमेदवार हर्षद कदम यांच्या प्रचारार्थ सभा घेत राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांच्यावर निशाणा साधल्यानंतर आता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे पाटण येथील मल्हार पेठमध्ये रविवार १७ रोजी सकाळी १०.३० वाजता सभा घेणार आहेत. या ठिकाणी ते नेमके काय बोलणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

पाटण मतदारसंघात होत असलेल्या तिरंगी लढतीकडे संपूर्ण राज्याच्या नजरा लागल्या आहेत. या ठिकाणी असलेल्या मातब्बर लोकप्रतिनिधींना धूळ चारण्यासाठी शिवसेनेचे उमेदवार हर्षद कदम यांनी देखील आपला पक्षातून अर्ज भरला आहे. आता रविवारी या मतदारसंघात उद्धव ठाकरे यांची तोफ धडाडणार आहे. या मतदारसंघात यावेळी राज्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा सातारा पालकमंत्री, आम. शंभूराज देसाई तसेच माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचे सुपुत्र सत्यजितसिंह पाटणकर आणि शिवसेना महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार हर्षद कदम यांच्यात होणारी लढत संपूर्ण राज्यासाठी लक्षवेधी ठरली आहे.

# सातारकरांनी मतदान करून मर्दानगी दाखवावी

■ सायगाव

**लोकशाहीने** मतदानाचा सर्वात मोठा अधिकार दिलेला आहे. या अधिकाराची जाणीव करण्यासाठी निवडणूक आयोग, सातारा जिल्हा प्रशासन व सामाजिक सेवाभावी संस्था जीवाचे रान करत आहेत. जनजागृती करण्यासाठी पायपीट करत आहेत. अशा वेळेला खेड्यापाड्यातील पारावर वायफळ राजकीय चर्चा करण्यापेक्षा योग्य उमेदवाराला मतदान करून मर्दानगी दाखवावी, असे आवाहन लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी झटणारे कार्यकर्ते करत आहेत. सातारा जिल्ह्यातील माण-खटाव, कराड उत्तर, कराड दक्षिण, कोरेगाव, सातारा- जावळी, फलटण, वाई- महाबळेश्वर-खंडाळा व पाटण विधानसभा मतदारसंघांमध्ये २० नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. या मतदान प्रक्रियेसाठी सर्व सुख सुविधा एवढेच नव्हे तर ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदार बंधू-भगिनींसाठी शासनाने योग्य ती दखल घेतलेली आहे. मतदान केंद्रावर जाण्यापेक्षा आपल्या घरातच मतदान करण्याचा अधिकार बहाल केलेला आहे. कुशल व कुशल कामगारांना मतदान करावे. यासाठी सार्वजनिक सुट्टी देण्यात आलेली आहे.

# भाजपा आमदाराच्या काकांचा काँग्रेस उमेदवाराला पाठिंबा

■ सोलापूर

पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात मंगळवेढ्याचे बबनराव आवताडे यांनी पुतण्या भाजपचे आमदार समाधान आवताडे यांना धक्का देत काँग्रेस उमेदवार भगीरथ भालके यांना पाठिंबा जाहीर केला आहे. बबनराव आवताडे यांच्यासोबतच त्यांचे चिरंजीव मंगळवेढा खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष सिद्धेश्वर आवताडे हेही भालकेंच्या पाठीशी उभे राहिले आहेत, त्यामुळे पंढरपूरची लढत दिवसेंदिवस रंगतदार होत चालली आहे. या मतदारसंघात भाजपाचे विद्यमान आमदार समाधान आवताडे, काँग्रेसकडून भगीरथ भालके, शरद पवार गटाकडून अनिल सावंत, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून दिलीप धोत्रे हे निवडणूक लढवित आहेत.

# अव्वल कारकून, तलाठी पदनामात बदल

■ पुसद

राज्यातील महसूल विभागातील अव्वल कारकून व तलाठी यांच्या पदनामात शासनाने बदल केला असून आता 'सहायक महसूल अधिकारी' व 'ग्राम महसूल अधिकारी' असे पदनाम करण्यात आले आहे. यापुढे महसूल विभागात जुने पदनाम दिसणार नाही. या निर्णयामुळे महसूल कर्मचाऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.

महसूल विभाग हा शासनाचा कणा असून जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त स्तरावर कामकाज करण्यात येते. या महसूल विभागातील काही पदांचे पदनाम बदलण्याची मागणी कर्मचारी संघटनांकडून करण्यात आली होती. अव्वल कारकून यांना कामकाजांचे नियंत्रण करताना संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संपर्क साधताना महसूल विभागातील अव्वल कारकून संवर्गास एक विशिष्ट पदनाम असणे आवश्यक आहे. त्यांना सहायक महसूल अधिकारी, असे पदनाम देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेद्वारे बऱ्याच वर्षांपासून केली होती. तसेच आता कोतवाल यांना 'महसूल सेवक' करण्यात आले आहे. महसूल विभागातील कनिष्ठ लिपिकांचे पदनाम यापूर्वीच महसूल सहाय्यक म्हणून बदलले आहे.

# गीता जैन यांच्या फोटोग्राफरला पकडले भाजपा उमेदवार मेहतांवर आरोप

■ भाईंदर

मीरा-भाईंदर मतदारसंघाच्या अपक्ष उमेदवार गीता जैन यांचा छायाचित्रकार हर्ष जैन याला काल सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ४ ते ५ जणांनी जबरदस्तीने कारमध्ये बसवून नेले. ही घटना सीसीटीव्हीमध्ये चित्रित झाली. त्यानंतर गीता जैन यांनी ताबडतोब जिल्हा पोलीस अधीक्षकांना फोन करून छायाचित्रकाराचे अज्ञातांनी अपहरण केल्याचे सांगितले. त्यानंतर हर्षचे अपहरण झाले नसून त्याला पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे जैन यांना समजले. या घटनेनंतर जैन या पोलीस ठाण्यात पोहोचल्यावर त्यांनी नरेंद्र मेहता यांच्याविरोधात आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर टाकल्याने हर्षला अटक केल्याचे समजले. यावेळी जैन म्हणाल्या की, सोशल मीडियावर अनेक व्हिडिओ आहेत, ते बनवणाऱ्या व्यक्तीवर कारवाई केली नाही. मात्र एक व्हिडिओ शेअर केल्यानंतर त्यांच्या सहकाऱ्याला पोलिसांनी तत्काळ ताब्यात घेतले.

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

सोडत दर बुधवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 46 • सोडत दिनांक 13/11/2024

| | |
|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | AK-02 : 5111 |
| उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 5111 — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई; श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 2168 | 4262 | 5305 | 5356 | 6354 | 6807 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1693 | 1703 | 3931 | 5245 | 5316 | 6307 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1193 | 2370 | 4083 | 4729 | 5052 | 5509 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1825 | 2368 | 3202 | 4485 | 5547 | 6092 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रु.100/- | | 1857 | 2243 | 2712 | 3131 | 3531 | 4078 | 4472 | 4952 | 5405 | 5707 | 6196 | 6687 |
| (सर्व मालिकांसाठी) | | 1871 | 2258 | 2719 | 3139 | 3550 | 4086 | 4493 | 4984 | 5407 | 5714 | 6207 | 6695 |
| 1014 | 1334 | 1895 | 2275 | 2720 | 3143 | 3617 | 4109 | 4496 | 4989 | 5415 | 5732 | 6219 | 6698 |
| 1023 | 1349 | 1906 | 2279 | 2721 | 3163 | 3622 | 4110 | 4500 | 4994 | 5439 | 5739 | 6221 | 6706 |
| 1047 | 1374 | 1913 | 2287 | 2758 | 3173 | 3634 | 4115 | 4514 | 5010 | 5454 | 5751 | 6261 | 6726 |
| 1051 | 1381 | 1914 | 2298 | 2759 | 3187 | 3660 | 4118 | 4524 | 5014 | 5458 | 5779 | 6265 | 6737 |
| 1055 | 1402 | 1937 | 2306 | 2762 | 3232 | 3664 | 4145 | 4550 | 5018 | 5476 | 5813 | 6280 | 6743 |
| 1061 | 1411 | 1940 | 2309 | 2767 | 3239 | 3693 | 4157 | 4570 | 5023 | 5506 | 5830 | 6319 | 6773 |
| 1065 | 1446 | 1946 | 2313 | 2803 | 3288 | 3703 | 4164 | 4579 | 5024 | 5511 | 5834 | 6334 | 6776 |
| 1080 | 1458 | 1970 | 2324 | 2805 | 3291 | 3732 | 4184 | 4595 | 5036 | 5520 | 5852 | 6366 | 6777 |
| 1088 | 1487 | 1981 | 2337 | 2814 | 3298 | 3740 | 4193 | 4619 | 5052 | 5533 | 5854 | 6376 | 6789 |
| 1108 | 1490 | 1993 | 2348 | 2824 | 3307 | 3747 | 4194 | 4622 | 5057 | 5534 | 5857 | 6386 | 6796 |
| 1109 | 1498 | 2023 | 2353 | 2825 | 3312 | 3773 | 4202 | 4630 | 5059 | 5540 | 5885 | 6406 | 6799 |
| 1110 | 1500 | 2027 | 2361 | 2862 | 3320 | 3790 | 4207 | 4643 | 5077 | 5541 | 5888 | 6424 | 6822 |
| 1111 | 1508 | 2041 | 2370 | 2872 | 3329 | 3823 | 4210 | 4650 | 5081 | 5546 | 5895 | 6430 | 6832 |
| 1112 | 1510 | 2043 | 2372 | 2900 | 3332 | 3839 | 4218 | 4651 | 5095 | 5553 | 5905 | 6433 | 6836 |
| 1137 | 1512 | 2070 | 2386 | 2903 | 3334 | 3863 | 4221 | 4670 | 5097 | 5558 | 5935 | 6454 | 6861 |
| 1153 | 1513 | 2082 | 2390 | 2906 | 3340 | 3869 | 4234 | 4680 | 5129 | 5559 | 5938 | 6467 | 6862 |
| 1158 | 1519 | 2092 | 2399 | 2913 | 3346 | 3873 | 4266 | 4683 | 5144 | 5560 | 5952 | 6516 | 6864 |
| 1181 | 1570 | 2123 | 2400 | 2922 | 3361 | 3880 | 4271 | 4723 | 5150 | 5561 | 5956 | 6524 | 6871 |
| 1187 | 1581 | 2128 | 2401 | 2960 | 3368 | 3906 | 4284 | 4729 | 5160 | 5566 | 5965 | 6530 | 6879 |
| 1196 | 1586 | 2142 | 2425 | 2973 | 3382 | 3909 | 4291 | 4743 | 5164 | 5575 | 5995 | 6546 | 6888 |
| 1204 | 1637 | 2143 | 2428 | 2980 | 3383 | 3916 | 4310 | 4745 | 5165 | 5582 | 6004 | 6562 | 6899 |
| 1205 | 1646 | 2150 | 2440 | 2982 | 3384 | 3917 | 4340 | 4747 | 5189 | 5584 | 6060 | 6571 | 6906 |
| 1215 | 1665 | 2179 | 2519 | 2998 | 3386 | 3938 | 4346 | 4758 | 5200 | 5585 | 6061 | 6576 | 6924 |
| 1218 | 1705 | 2197 | 2546 | 3004 | 3388 | 3963 | 4349 | 4762 | 5213 | 5591 | 6066 | 6596 | 6935 |
| 1232 | 1710 | 2200 | 2552 | 3018 | 3413 | 3970 | 4354 | 4780 | 5240 | 5592 | 6096 | 6614 | 6938 |
| 1250 | 1711 | 2212 | 2554 | 3021 | 3416 | 3992 | 4385 | 4784 | 5255 | 5594 | 6097 | 6631 | 6960 |
| 1251 | 1718 | 2218 | 2569 | 3041 | 3421 | 4002 | 4403 | 4830 | 5276 | 5608 | 6100 | 6635 | 6964 |
| 1256 | 1725 | 2223 | 2579 | 3058 | 3425 | 4004 | 4409 | 4842 | 5295 | 5617 | 6116 | 6637 | 6966 |
| 1273 | 1731 | 2224 | 2603 | 3064 | 3473 | 4009 | 4414 | 4872 | 5297 | 5639 | 6131 | 6641 | 6973 |
| 1300 | 1771 | 2229 | 2609 | 3080 | 3477 | 4023 | 4428 | 4896 | 5303 | 5654 | 6134 | 6648 | 6974 |
| 1311 | 1809 | 2233 | 2622 | 3083 | 3480 | 4028 | 4429 | 4908 | 5313 | 5669 | 6135 | 6665 | 6976 |
| 1313 | 1813 | 2235 | 2632 | 3087 | 3482 | 4048 | 4442 | 4940 | 5328 | 5678 | 6144 | 6670 | 6986 |
| 1320 | 1814 | 2238 | 2646 | 3089 | 3494 | 4057 | 4444 | 4942 | 5351 | 5693 | 6160 | 6676 | 6992 |
| 1329 | 1824 | 2240 | 2669 | 3105 | 3508 | 4065 | 4469 | 4947 | 5356 | 5696 | 6162 | 6681 | 6998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी (सोडत संध्या. 5:00)

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 46 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 13/11/2024

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10000/- | MG-06 : 1369 | | | | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 4359 (श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे) | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1399 | 1874 | 5999 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 6228 (ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे) | 7538 (जे. पी. एस. लॉटरी सेंटर, डहाणू) |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 400/- | 1821 | 2806 | 3535 | 4437 | 5221 | 6130 | 7440 | 8161 |
| 1108 | 1911 | 2810 | 3590 | 4445 | 5253 | 6263 | 7543 | 8182 |
| 1152 | 1916 | 2992 | 3913 | 4466 | 5305 | 6405 | 7647 | 8387 |
| 1171 | 2228 | 3172 | 3932 | 4577 | 5327 | 6745 | 7722 | 8421 |
| 1189 | 2343 | 3209 | 3937 | 4689 | 5593 | 6990 | 7728 | 8608 |
| 1190 | 2605 | 3252 | 4214 | 4704 | 5595 | 7107 | 7745 | 8664 |
| 1204 | 2624 | 3266 | 4378 | 4947 | 5687 | 7133 | 7776 | 8781 |
| 1329 | 2675 | 3347 | 4425 | 4948 | 5714 | 7211 | 7871 | 8872 |
| 1487 | 2772 | 3433 | 4427 | 5185 | 5816 | 7414 | 7882 | 8921 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री (सोडत सायं. 4:30 वाजता)

• विजयालक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 46 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 13/11/2024

| | | | |
|---|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SV-03 : 1894 | | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 1491 | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1250 | 3071 | 5225 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर) |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1050 | 2081 | 2949 | 3899 | 5195 |
| 1069 | 2177 | 3329 | 4239 | 5240 |
| 1281 | 2245 | 3377 | 4444 | 5309 |
| 1600 | 2490 | 3396 | 4609 | 5533 |
| 1710 | 2577 | 3441 | 4640 | 5535 |
| 1809 | 2729 | 3443 | 4725 | 5620 |
| 1871 | 2762 | 3467 | 4732 | 5714 |
| 1973 | 2921 | 3613 | 4844 | 5938 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी (सोडत संध्या. 4:45 वाजता)

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 46 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 13/11/2024

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 1391 | 3779 | 9952 (जलाराम लॉटरी, अकोला) | 0882 | 3888 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 4404 | 7988 | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3638 | 4488 | 6503 | 6655 | 8279 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2211 | 2546 | 3281 | 4122 | 4285 | 7081 | 7696 | 7744 | 8826 | 9181 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0615 | 0934 | 1782 | 4386 | 4692 | 5553 | 6545 | 6727 | 6755 | 7458 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहावे बक्षिस रु. | 0823 | 1775 | 2784 | 4034 | 4688 | 5657 | 6694 | 7751 | 8468 | 9111 |
| 300/- | 0842 | 1813 | 2897 | 4081 | 4744 | 5744 | 6751 | 7759 | 8504 | 9119 |
| 0035 | 0857 | 1879 | 2923 | 4194 | 4746 | 5772 | 6753 | 7767 | 8517 | 9129 |
| 0044 | 0931 | 2178 | 2991 | 4219 | 4849 | 5806 | 6763 | 7792 | 8573 | 9144 |
| 0049 | 0966 | 2218 | 3025 | 4241 | 4912 | 5857 | 6783 | 7848 | 8600 | 9148 |
| 0051 | 1051 | 2220 | 3072 | 4284 | 5051 | 5952 | 6869 | 7867 | 8630 | 9393 |
| 0088 | 1116 | 2232 | 3116 | 4306 | 5116 | 5956 | 6915 | 7875 | 8646 | 9422 |
| 0133 | 1126 | 2249 | 3128 | 4382 | 5134 | 6082 | 6988 | 7883 | 8689 | 9425 |
| 0144 | 1154 | 2444 | 3154 | 4384 | 5186 | 6153 | 7041 | 7963 | 8708 | 9598 |
| 0201 | 1228 | 2452 | 3183 | 4403 | 5200 | 6206 | 7059 | 7992 | 8835 | 9618 |
| 0433 | 1230 | 2506 | 3231 | 4414 | 5255 | 6271 | 7117 | 8030 | 8863 | 9777 |
| 0437 | 1252 | 2526 | 3274 | 4419 | 5290 | 6362 | 7121 | 8063 | 8879 | 9827 |
| 0485 | 1267 | 2565 | 3306 | 4441 | 5395 | 6424 | 7126 | 8099 | 8884 | 9842 |
| 0491 | 1306 | 2591 | 3384 | 4448 | 5398 | 6464 | 7151 | 8136 | 8928 | 9861 |
| 0500 | 1320 | 2623 | 3503 | 4494 | 5491 | 6617 | 7159 | 8198 | 8944 | 9909 |
| 0520 | 1517 | 2655 | 3539 | 4496 | 5498 | 6632 | 7197 | 8218 | 8978 | 9916 |
| 0599 | 1555 | 2667 | 3573 | 4502 | 5532 | 6634 | 7203 | 8284 | 9053 | 9920 |
| 0658 | 1661 | 2736 | 3575 | 4540 | 5550 | 6653 | 7551 | 8438 | 9069 | 9925 |
| 0789 | 1703 | 2743 | 3997 | 4634 | 5555 | 6678 | 7571 | 8463 | 9095 | 9982 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. १४/११/२०२४

| | | |
|---|---|---|
| १ | ३ | ८ |
| १२ | ३० | ८० |
| १७ | ३५ | ८५ |
| १४६ | १२० | ३५० |
| २३६ | ३४६ | ४६८ |

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥





# तुळशी विवाह मांगल्याचा प्रवाह

लग्न किंवा विवाह हा एकूणच भारतीय समाजव्यवस्थेचा घरगुती आणि तितकाच सामाजिक असा लाडका विषय ठरतो. तो केवळ उपचार नाही तर विवाह संस्कार आहे असे सांगून त्याचे महत्त्व आणि अनिवार्यता त्यातून स्पष्ट होते. निदान महाराष्ट्रातल्या तरी अनेक विवाह समारंभांच्या लग्नपत्रिकांवर कार्य पार पाडण्यास श्रीसमर्थ आहेत. परंतु आपण सहपरिवार शुभेच्छा आणि शुभाशीर्वाद देण्यासाठी यावे अशी आग्रहाची विनंती केलेली असते. परंतु विवाहाच्यानिमित्ताने जशा अनेक मुद्यांना महत्त्व प्राप्त होते. तसेच विवाहांची ही परंपरा एक सुदृढ विचारप्रवाहसुद्धा समृद्ध करीत राहते. मग विवाह पार पाडण्यास समर्थ असणाऱ्या ईश्वराचाही विवाह घडवून आणण्याची कल्पना राबवली जाते. म्हणूनच महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये प्रबोधिनी एकादशी ते कार्तिकी पौर्णिमेपर्यंत तुळशी विवाहाची एक आगळीवेगळी धूम पाहायला मिळते. प्रत्यक्ष देवाचाच तुळशीशी विवाह लावून अशा मंगलकार्यातून मांगल्याचेच आवर्तन घडवण्याचा प्रयत्न होतो. तुळशीविवाहाचे हे निमित्त आणि त्यातून साधला गेलेला विचार समाज व्यवस्थेलाही बांधून ठेवणारा आणि संस्कृतीशी, पर्यावरणाशी असलेला संबंध अधिक घनिष्ठ करणारा ठरतो. याला केवळ एक कर्मकांड किंवा हौस, उत्साह म्हणून केलेला उपक्रम जरी गृहित धरले तरी त्यातून साधला जाणारा उद्देश खूप व्यापक स्वरूपाचा ठरतो. मग तुळशी विवाहाच्या निमित्ताने मनाचे आणि पर्यावरणाचेही पावित्र्य जपले जाते. श्रीकृष्णाशी लागणारा तुळशीचा विवाह म्हणजे ब्रह्मांडाचा आणि देहरूपी पिंडाचा काही ना काही संबंध असल्याचे दाखवून जातो. श्रीकृष्णाला तुळस प्रिय असल्याचे पुराणांमधून सांगितले गेले. आणि भगवंताला ज्या ज्या गोष्टी प्रिय आहेत त्या सगळ्या व्यक्ती आणि समाजाच्या हिताचाच विचार करणाऱ्या ठरतात याबद्दलही दुमत राहत नाही. अशा कितीतरी वनस्पती आहेत की ज्याचे भारतीय संस्कृतीने पूजाअर्चेच्या माध्यमातून महत्त्व सांगितलेले आहे.

**पावित्र्य आणि पर्यावरण**

अन्य सगळ्या वनस्पतींमध्ये तुळशीला मिळालेले हे महत्त्व स्पष्ट करते. तिचा आरोग्यदृष्ट्या होणारा उपयोग सर्वाधिक प्राणवायू देणारी वनस्पती आणि या तुळशीला नित्य देवपूजेमध्ये मिळालेले महत्त्व अशा कारणांमुळे नकळतपणे या वनस्पतीविषयी पावित्र्यभाव जागवला जातो. रात्रीच्यावेळीसुद्धा सर्वाधिक प्राणवायू आणि ओझोनवायू देणारी ही वनस्पती आहे असे सांगितले गेले आहे. आयुर्वेदामधून तुळशी कशी आरोग्यवर्धक आणि व्याधीनाशक आहे हे प्रकर्षाने सांगितले गेले. कदाचित म्हणूनच महिना दीड महिना वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांच्या गळ्यातही तुळशीच्या माळेला महत्त्व मिळाले असावे. प्रत्यक्ष पांडुरंगाला तुळशीचा हारच प्रिय असतो. म्हणूनच अनेक संतांनी आपापल्या अभंगांमधून तुळशीविषयी व्यक्त केलेला आदरभाव हा पावित्र्य, श्रद्धा आणि संकल्पांनाही बळ देणारा आहे. तुकाराम महाराजांनी

तुळशीहार गळा कासे पितांबर
आवडे निरंतर हेचि ध्यान।

असे म्हणून पांडुरंगाची स्तुती केली. संत नामदेवांनीसुद्धा तुळशीमहात्म्य सांगताना म्हटले आहे की,

तुळशीविण ज्याचे घर ते जाणावे अघोर।
तेथे वसती यम किंकर आज्ञा आहे म्हणोनी।
तुलसी वृंदावन ज्याचे घरी त्यासी प्रसन्न श्रीहरी।

एवढेच नाही तर आपल्या मनाच्या संकल्पांसाठीसुद्धा तुळशीची आराधना ही समृद्धता देणारी ठरते. नामदेवांनीच म्हटले आहे की

तुळस असे ज्याचे घरी लक्ष्मी वसे त्याचे घरी।
जे तुळशी घालिती उदका ते नर पावती ब्रह्मसुखा।

म्हणजे तुळशीच्या उपासनेतून जागवला जाणारा मांगल्यभाव हा समृद्धतेलाही आमंत्रण देणारा ठरतो. स्वाभाविकपणे ही मानसिक शुद्धता शारीरिक व्याधींनासुद्धा दूर ठेवायला नकळतपणे दूर करते. तुळशीशी नित्यनेमाने येणारा संपर्क किंवा पंचामृत, प्रसाद, या माध्यमातून होणारे तुळशीचे सेवन हेसुद्धा शरीरासाठी पोषक ठरते. वारकऱ्यांनी या तुळशीच्या माळेला आपल्या कंठाशी जपले आहे. यासाठीच तुकाराम महाराज म्हणतात की

आम्ही तेणे सुखी। म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी।
कंठी मिरवा तुळशी। व्रत करा एकादशी।

म्हणजेच अनेक अर्थांनी जर सुखाचा अनुभव घ्यायचा असेल तर गळ्यामध्ये तुळशीमाळ असणे किती महत्त्वाचे आहे. हेच त्यातून स्पष्ट होते.

**लाभदायक घरोबा**

दरवर्षी महाराष्ट्रात घडून येणारा हा तुळशीविवाहाचा उपक्रम उत्सव म्हणून साजरा होतो. पण त्यानिमित्ताने घडून येणारी पर्यावरण जागृतीसुद्धा महत्त्वाची ठरते. भारतात अनेकानेक वनस्पतींची पूजाअर्चा होत असते. मग वड पिंपळांपासून ते औदुंबरापर्यंत किंवा आंब्यापासून ते आवळ्याच्या झाडापर्यंत हे वृक्ष किंवा वनस्पती संवर्धन सांगितले गेले आहे. परंतु तुळशीला मात्र अधिक महत्त्व मिळालेले आहे. स्वाभाविकपणे अनेक उत्सवांशी जशा लोकभावना जोडल्या जातात तशाच लोकभावना या तुळशीविवाहाशीसुद्धा जोडल्या गेल्या आहेत. निदान महाराष्ट्रात तरी अशी समजूत आहे की घरातल्या मंगलकार्यासाठी तुळशी विवाह केला जावा किंवा तुळशी विवाह झाल्यानंतरच अन्य विवाहांचे मुहूर्तही सुरू होतात. केवळ महिला वर्गच नाही तर पुरुषांसाठीसुद्धा रोजचे तुळस पूजन हे भाग्यवर्धक म्हटले आहे. त्यातला मानसिक शांततेचा आणि चांगल्या आरोग्याचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो. बाराही मास आणि कुठेही उपलब्ध होणारी ही तुळशी जवळपास सगळ्या व्याधींवर परिणाम करणारी ठरते. आधुनिक वैद्यकशास्त्रात त्याला जरी महत्त्व नसले तरी आयुर्वेदामधून तुळशीचा काढा गौरवला गेला आहे. ज्या गोष्टीसाठी कोणतेही पैसे मोजावे लागत नाहीत. सहजपणे उपलब्ध होणारी वनस्पती आणि तिच्याशी नियमितपणे असणारा संपर्क हा जर आरोग्याला पोषक ठरत असेल तर त्याचा उपयोग तितक्याच सहजपणे करण्याची भारतीयांची मनस्थिती असते. प्रसन्नता आणि त्यातून सकारात्मक मानसिकतेची जोपासना करणारी ही तुळस यासाठीच सर्वाधिक महत्त्व ठेवून आहे यात काही शंका राहत नाही. म्हणूनच अशा या तुळशीविवाहाच्या संकल्पनेतून तिच्याशी केला जाणारा घरोबा लाभदायक ठरलेला आहे.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**ऐकवेळ भिक्षापात्र भरलं जाऊ शकतं, पण इच्छापात्र कधीही भरत नाही. समाधानातच खरे सुख आहे.**

## पंचांग

**गुरुवार, १४ नोव्हेंबर, २०२४**
**शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर**
**कार्तिक शुक्ल त्रयोदशी/चतुर्दशी**
**नक्षत्र : अश्विनी**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०३-१० मीन**
**०३-११ ते २४-०० मेष**

**रवी उदय- ०६-४७**
**रवी अस्त- १७-५९**

**वैकुंठ चतुर्दशी, उपवास, गोरक्षनाथ प्रकट दिन, पौर्णिमा उत्तररात्री ६.१९ नंतर, पंडित नेहरू जन्मदिन, बाल दिन, जागतिक मधुमेह नियंत्रण दिन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### मटार पुरी



★ **साहित्य** -
२ वाटी मटार,
३ चमचे रवा,
५-६ हिरव्या मिरच्या,
आल्याचा लहान तुकडा,
१ वाटी कोथिंबीर,
१ चमचा जिरे,
१/२ चमचा धणे,
१ चमचा बडिशेप,
१/२ चमचा ओवा,
तेल आवश्यकतेनुसार

★ **कृती** - सर्वप्रथम खलबत्यामध्ये जिरे, धणे, बडिशेप, ओवा बारीक करून घ्या. आता दुसरीकडे वरील खलबत्यातील मसाला आणि बारीक चिरलेली कोथिंबीर, हिरव्या मिरच्या, आले, मटार आणि पाणी टाकून मिक्सरमध्ये पुन्हा बारीक करून घ्यावे. तोपर्यंत एका ताटात मीठ, हळद, कणिक, रवा आणि बारीक केलेले मसाले घालून पीठ मळून घ्या. जवळपास २० ते ३० मिनिटांनंतर पिठाच्या लहान लहान पुऱ्या तयार करून घ्याव्यात. या तयार पुऱ्या गरम तेलात तळून घ्या. तयार मटार पुरी भाजीबरोबर सर्व्ह करा.

# चॅम्पियन ट्रॉफीमुळे पाकिस्तानचा जीव टांगणीला यजमानपद गेल्यास १८०४ कोटींचा फटका बसणार

**पुढील वर्षीच्या फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या चॅम्पियन ट्रॉफीमुळे भारत - पाकिस्तानमध्ये जे राजकारण सुरु आहे त्याचा मोठा आर्थिक फटका पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला आणि आयसीसीला सुद्धा बसणार आहे. ही स्पर्धा पाकिस्तानमध्ये होणार आहे. त्यामुळे या स्पर्धेसाठी पाकिस्तानने मोठा खर्च केला आहे. काही देशांकडून कर्ज घेतले आहे. त्यामुळे पाकिस्तानचे यजमानपद गेल्यास पीसीबीला १८०४ कोटींचा फटका बसू शकतो . पीसीबीच्या एका अधिकाऱ्यानेच ही माहिती दिली आहे. म्हणूनच पाकिस्तानचा जीव टांगणीला लागलेला आहे .**



■ लाहोर

पाकिस्तानात श्रीलंकेच्या संघावर हल्ला झाला होता. तसेच भारत -पाकिस्तानमधील सध्याचे तणावपूर्ण वातावरण पाहता भारतीय संघाच्या सुरक्षेबाबत बीसीसीआयने चिंता व्यक्त करीत चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी भारतीय संघ पाकिस्तानात पाठवला जाणार नाही . असे यापूर्वीच स्पष्ट केले. त्यानंतर आयसीसी, बीसीसीआय आणि पीसीबी यांच्यात अनेक बैठका झाल्या मात्र तोडगा निघू शकला नाही. अखेर हायब्रीड मॉडेल नुसार भारताचे सामने त्रयस्थ देशात खेळवावेत असा एक प्रस्ताव पुढे आला. पण या प्रस्तावाला अजूनही दोन्ही देशांकडून प्रतिसाद मिळालेला नाही . त्यामुळे या स्पर्धेचे भवितव्य अधांतरी आहे. अशा स्थितीत पाकिस्तानची अवस्था केविलवाणी झाली आहे. कारण अगोदरच पाकिस्तानची आर्थिक स्थिती चांगली नाही. त्यातच या स्पर्धेसाठी पाकिस्तानने लाहोर, रावळपिंडी, आणि इस्लामाबाद येथील काही स्टेडियमचे नुतनीकरण केले आहे. त्यावर मोठा खर्च झाला आहे. तसेच या स्पर्धेचे प्रायोजक आणि सामन्याच्या प्रसारणाच्या हक्काबाबतही पाकिस्तानने काही कंपन्यांशी बोलणी केलेली आहे.अशा स्थितीत जर पाकिस्तानच्या हातून यजमानपद गेले आणि ही स्पर्धा दुसऱ्या देशात खेळवण्यात आली तर पाकिस्तानला १८०४ कोटी रुपयांचा फटका बसू शकतो आणि सध्या तरी एवढे मोठे नुकसान सोसण्या इतपत पाकिस्तानी क्रिकेट मंडळाची क्षमता नाही त्यामुळे पाकिस्तानचा जीव टांगणीला लागला आहे.

## अर्जुन तेंडुलकरची भेदक गोलंदाजी! ५ बळी घेतले



■ मुंबई

रणजी ट्रॉफी २०२४ ची पाचवी फेरी सुरू झाली. सध्या गोव्याचा सामना अरुणाचल प्रदेशशी होत असून या सामन्यात मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकरची कामगिरी चर्चेचा विषय ठरली आहे. अर्जुनने अरुणाचल प्रदेशविरुद्ध कारकिर्दीत पहिल्यांदाच पाच विकेट घेत विरोधी संघाला १०० धावाही करू दिल्या नाहीत. अरुणाचल प्रदेशकडून केवळ ४ फलंदाज दुहेरी धावांचा आकडा धावा गाठू शकले. त्यापैकी सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजाने २५ धावा केल्या. अरुणाचल प्रदेशचा संपूर्ण संघ ३०. ३ षटकात केवळ ८४ धावा करून गडगडला.या सामन्यात अरुणाचल प्रदेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र हा निर्णय अर्जुन तेंडुलकरने आपल्या भेदक गोलंदाजीने पूर्णपणे चुकीचा सिद्ध केला. त्यानं नबाम हाचांग (०), नीलम ओबी (२६), जय भावसार (०), चिन्मय पाटील (३) आणि मोजी आटे (१) यांना बाद केले. अर्जुनने आपल्या क्रिकेट कारकिर्दीत प्रथमच एका डावात पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे.

## हातात बांगड्या भरा ! पाकिस्तानी खेळाडूची बीसीसीआयला शिवीगाळ

■ इस्लामाबाद

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी बीसीसीआयने टीम इंडियाला पाकिस्तानात पाठवायला नकार दिला आहे. भारतीय क्रिकेट बोर्डाने चॅम्पियन्स ट्रॉफीबद्दलचा आपला निर्णय जाहीर केल्यापासून क्रिकेट विश्वात एकच खळबळ उडाली आहे. च्या निर्णयावरुन पाकिस्तानात हंगामा सुरु आहे. पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू तनवीर अहमदने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. तो शिवीगाळ करण्यावर उतरलाय. त्याने खुलेआम सोशल मीडियावर आक्षेपार्ह शब्द वापरले भारत-पाकिस्तानात येणार नसल्याने तनवीर अहमद मागच्या काही दिवसांपासून आक्रमक वक्तव्य करतो. 'बीसीसीआयने आपल्या हातात बांगड्या भराव्या' असं त्याने म्हटलं आहे. तो एवढयावरच थांबला नाही, भारतीय क्रिकेट बोर्डाबद्दल खोटारडे, नीच, बदमाश आणि दुटप्पी असे आपत्तीजनक शब्द वापरले. बीसीसीआयपेक्षा एका गाढवावर विश्वास ठेवणे केव्हाही चांगलं. तो फसवणार नाही असं तनवीर अहमद म्हणाला. त्याने पाकिस्तानी मीडियाला भारतीय मीडियाला बोलवू नका असं अपील केलं.

## वर्ल्डकप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत ध्रुव मोरेला सुवर्णपदक




■ पणजी

गोवा येथे झालेल्या २४ व्या एफ एस के ए वर्ल्डकप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत मुंबईच्या गिरगाव मधील संस्कार अकॅडमी शाळेच्या ध्रुव संदेश मोरे या ८ वर्ष वयाच्या विद्यार्थ्यांने सुवर्णपदक पटकावले. त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. गोव्याच्या म्हापसा येथील पेडेम सपोर्ट कॉम्प्लेक्स मध्ये ७ ते १० नोव्हेंबर दरम्यान २४ वी वर्ल्डकप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेत भारतासह अमेरिका, जपान, इटली कॅनडा आदी २३ देशांच्या स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत ध्रुवने सुवर्ण यश मिळवले. शिवाजी पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली ध्रुव वयाच्या ५ व्या वर्षांपासून कराटेचे प्रशिक्षण घेत आहे. त्याने अनेक कराटे स्पर्धांमध्ये भाग घेऊन यश मिळवले आहे .

## पर्थमध्ये टीम इंडियाचा सिक्रेट ट्रेनिंग कॅम्प

■ पर्थ

आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या २०२३-२५ चक्रातील सर्वात महत्त्वपूर्ण कसोटी मालिका २२ नोव्हेंबर पासून पर्थच्या मैदानातून सुरु होत आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावकर ट्रॉफीसाठी होणाऱ्या कसोटी मालिकेत यावेळी ४ ऐवजी ५ कसोटी सामने खेळवले जाणार आहेत. या मालिकेच्या निकालावर भारतीय संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची सलग तिसरी फायनल खेळणार की नाही याचा फैसला होणार आहे.

## प्रो कबड्डी लीग ! पुणेरी पलटण - दबंग दिल्ली सामना बरोबरीत

■ नोएडा



प्रो कबड्डी लीगच्या ११ व्या हंगामात जबरदस्त कामगिरी करणाऱ्या पुणेरी पलटणला दबंग दिल्ली विरुद्धच्या सामन्यात विजय मिळवता आला नाही. पलटणकडे १२ गुणांची आघाडी असतानाही सामना ३८-३८ असा बरोबरीत सुटला

पुणेरी पलटण विरुद्ध दबंग दिल्ली सामन्यात पायाला दुखापत झाल्याने कर्णधार अस्लम इनामदार खेळू शकला नाही नेमकी हीच बाब दबंग दिल्लीच्या पथ्यावर पडली. आशु मलिकच्या तुफानी चढायापुढे पुणेरी पलटणचा बचाव दुबळा पडला आकाश शिंदे ८ आणि मोहित गोयल ६ यांनी चढायामध्ये चांगली चमक दाखवली. पण आघाडी वाचवणे त्यांना शक्य झाले नाही. अखेरपर्यंत सामना चुरशीचा झाला पण शेवटी दबंग दिल्लीने बाजी मारली आणि सामना ३८ - ३८ असा बरोबरीत सुटला. त्यामुळे पुणेरी पलटणला या सामन्यानंतर गुणतालिकेत गुणसंख्या वाढवता आली नाही. मात्र या पराभवामुळे पुणेरी पलटणच्या खेळाडूंनी आत्मविश्वास गमावला आहे. तर कर्णधार इनामदार पुढील सामन्यात खेळू शकणार नाही.

## कुमामोटो मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा ट्रीसा - गायत्री जोडीचा पराभव

■ कुमामोटो

सध्या जपानच्या कुमामोटो येथे सुरु असलेल्या कुमामोटो मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला दुहेरीत भारताच्या ट्रीसा जॉली व गायत्री गोपीचंद या जोडीचा चिनी तायपेच्या ह्यूम इन हुई व लीन इन हुई या जोडीने २१-१६ गुणांनी पराभव केला. त्यामुळे या स्पर्धेत आता महिला एकेरीत पी.व्ही. सिंधू आणि पुरुष एकेरीत लक्ष्य सेन या दोन खेळाडूंवर भारताची मदार आहे.

महिला दुहेरीच्या सामन्यात सुरुवातीपासूनच चिनी जोडीने आक्रमक खेळ करीत पहिला सेट जिंकला त्यानंतर दुसऱ्या सेट मध्येही त्यांनी जबरदस्त खेळ करीत ३६ मिनिटात विजय मिळवला त्यामुळे महिला दुहेरीत ट्रीसा जॉली व गायत्री गोपीचंद या भारतीय महिला जोडीचे आव्हान संपुष्टात आले आहे. या जोडीच्या पहिल्या फेरीतील पराभवामुळे भारतीय चाहतेही निराश झाले आहेत.

## श्री मावळी मंडळ शरीर सौष्ठव स्पर्धेत जाधव, ठाकूर किताबाचे मानकरी

■ ठाणे



श्री मावळी मंडळ ठाणे या संस्थेने आपल्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या ३५ व्या जिल्हास्तरीय, अंतर्गत शरीरसौष्ठव स्पर्धेत किशोर सीताराम जाधव याने अंतर्गत श्री मावळी मंडळ श्री आणि जिल्हास्तरीय स्पर्धेत ठाण्याच्या एबीएस स्टुडिओ जिमच्या करण श्रवण ठाकूरने श्री मावळी मंडळ श्री किताब मिळवला. यजमान श्री मावळी मंडळाने स्पर्धेचे सांघिक विजेतेपद मिळवले. तर एबीएस स्टुडिओ जीमने उपविजेतेपद पटकावले. संस्थेच्या क्रीडांगणात ही स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली.

# फडणवीसांची बॅग तपासतानाचा व्हिडिओ ठाकरेंच्या तपासणीबद्दल आयोगाकडून कौतुक

■ मुंबई

**उबाठा** नेते उध्दव ठाकरे यांची सलग दोन दिवस बॅग तपासल्याने त्यांनी संतप्त होऊन इतरांच्या बॅगा का तपासल्या जात नाहीत असा सवाल केला. त्यानंतर आज भाजपाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बॅग तपासणीचा ५ नोव्हेंबरचा व्हिडिओ व्हायरल केला. इतकेच नव्हे तर ज्या अधिकाऱ्यांनी उध्दव ठाकरे यांच्या बॅगेची तपासणी केली त्या अधिकाऱ्यांचे निवडणूक आयोगाने खास कौतुक केले आणि त्यांनी निर्भिडपणा दाखवल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र दिले. यावरून आता राजकीय वातावरण तापणार आहे.

महाराष्ट्र भाजपाने दावा केला की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कोल्हापूर आणि यवतमाळ येथे बॅग तपासली होती. ५ नोव्हेंबरला कोल्हापूर येथे फडणवीस यांच्या बॅग तपासणीचा व्हिडीओ पोस्ट केला आणि ठाकरेंवर टीका केली की, काही नेत्यांना तमाशा करण्याची सवयच असते. ७ नोव्हेंबरला यवतमाळ जिल्ह्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बॅगची तपासणी झाली होती. पण, त्यांनी व्हिडिओ काढला नाही.

# लखिमपूर खिरी हिंसाचार प्रकरणी १२ आरोपींची जामिनावर मुक्तता

■ लखनौ

**राजकीयदृष्ट्या** संवेदनशील असलेल्या लखिमपूर खिरी हिंसाचार प्रकरणी अलाहाबाद



उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने १२ संशयित आरोपींना नियमित जामीन मंजूर केला. या हिंसाचारात १२ लोकांचा बळी गेला होता. माजी केंद्रीय मंत्री अजय मिश्रा यांचा मुलगा आशिष या प्रकरणात मुख्य आरोपी आहे. त्याला याआधीच सर्वोच्च न्यायालयाने जामीन दिला आहे.

उर्वरित १२ आरोपींनी जामिनासाठी केलेल्या अर्जावर न्या. कृष्णा पहल यांच्या एकल पीठासमोर सुनावणी झाली. लखिमपूर खिरी जिल्ह्यातील टिकुनिया येथे एका महागड्या कारने चार शेतकऱ्यांना चिरडले. या गाडीमध्ये आशिष मिश्रा होता. अपघातानंतर संतप्त शेतकऱ्यांनी त्या गाडीवर हल्ला चढवला.

## नागपुरात फडणवीसांची दहशत रोहित पवारांचा गंभीर आरोप

■ नागपूर

नागपुरात देवेंद्र फडणवीस यांची दहशत असून काही लोक नाराज आहेत, लोक समोर येऊन बोलत नाही, असा आरोप शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केला. पूर्व नागपूरचे राष्ट्रवादीचे उमेदवार दुनेश्वर पेठे यांच्या प्रचारार्थ आले होते. यावेळी ते म्हणाले की, नागपूर भाजपाचा गड राहिला नाही. लोक फडणवीस यांच्यावर नाराज आहेत. त्यांची राज्यात आणि त्यांच्या शहरातही दहशत आहे. शरद पवार मराठी माणसाचे प्रतीक आहेत भाजपाने महाराष्ट्राचा कमी आणि गुजरातचा जास्त विचार केला आहे. त्यामुळे आम्ही निश्चय केला की, काही केले तरी महाविकास आघाडीचे सरकार आणायचे. राज्याला विकासाचे एक नंबरचे राज्य बनून दाखवायचे आहे.

# मविआ जागावाटपात काही चुका पृथ्वीराज चव्हाण यांची कबुली



■ मुंबई

**महाविकास** आघाडीच्या जागावाटपाच्या वाटाघाटीत काही चुका झाल्या आहेत, असे वक्तव्य आज माजी मुख्यमंत्री व काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केले. विधानसभा निवडणुकीच्या मतदानाचा दिवस जवळ आला तरी मविआ जागावाटपातील घोळ अजून संपलेला नाही. यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

पृथ्वीराज चव्हाण यांनी आज मविआच्या जागावाटपातील चुकांवर बोट ठेवले. ते म्हणाले की, मविआ जागावाटपाच्या वाटाघाटीत काही चुका झाल्या आहेत. या चुका प्रामुख्याने दोन गोष्टींमध्ये झाल्या आहेत. उद्धव ठाकरे व शरद पवार यांनी त्यांच्या नेत्यांना वाटाघाटीसाठी पाठवले. ते स्वतः प्रचारासाठी मोकळे राहिले. याउलट आमच्या बाजूने सर्वच नेते स्वतः वाटाघाटीसाठी उतरले. यामुळे रस्त्यावर कुणीच उरले नाही. काँग्रेस पक्षाने अंतर्गत बैठक घेऊन, या मुद्यावर गांभीर्याने चर्चा करून जागावाटपावरील आपली भूमिका ठरवण्याची गरज होती. जागावाटपात सुरुवातीला अवास्तव भूमिका मांडण्यात आली. म्हणजे हेही चांगले आणि तेही चांगले. पण प्रत्यक्ष चर्चेला गेल्यानंतर त्यातील काहीच झाले नाही. वाटाघाटीत काँग्रेस कमी पडली हे आम्ही मान्य करतो. पण या प्रकरणी फार चुका झाल्या असेही काही नाही. पहिली यादी फार चांगली होती. दुसऱ्या यादीत तडजोडी कमी झाल्या. पण काँग्रेसला जागावाटपात फार जास्त जागा मिळणे व्यवहार्य नव्हते हे तेवढेच खरे होते.

# आता सर्वोच्च न्यायालयात तत्काळ सुनावणीसाठी तोंडी उल्लेखावर बंदी

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाचे न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी ५१ वे सरन्यायाधीश म्हणून नुकतीच शपथ घेतली आहे. शपथ घेतल्यावर लगेच त्यांनी एक मोठा निर्णय घेतला आहे. त्यांनी सर्वोच्च न्यायालयात आलेल्या प्रकरणांच्या तात्काळ सुनावणीसाठी तोंडी उल्लेखावर बंदी घातली आहे. आता अशी प्रकरणे तात्काळ सुचीबद्ध करण्यासाठी आणि त्यांच्यावर सुनावणीसाठी तोंडी उल्लेख करण्याची परवानगी दिली जाणार नाही. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी म्हटले आहे की कोणत्याही प्रकरणात तात्काळ सुनावणीसाठी ईमेल किंवा लेखी पत्र पाठवावे लागेल.

सर्वसाधारणपणे वकील तातडीच्या सुनावणीसाठी दिवसाच्या कामकाजाच्या सुरुवातीला कोर्टाच्या समोर त्यांची प्रकरणे नमूद करतात. पण सुनावणीसाठी आता तोंडी उल्लेख चालणार नाही. ही कार्यवाही फक्त ईमेल किंवा लिखित स्लिप/पत्राद्वारे पुढे जाईल. तात्काळ सुनावणीची मागणी करताना त्यात कारणे देणे बंधनकारक असणार आहे.

# पनवेलकरांना हक्काचे पाणी मिळणार! पाणीपुरवठा क्षमता वाढणार

■ पनवेल

**महापालिका** क्षेत्रात १०० एमएलडी पाणी पुरविणारी न्हावा शेवा पाणीपुरवठा योजनेची क्षमता दुपटीपेक्षा जास्त वाढून २२८ एमएलडी होणार आहे. त्यामुळे पनवेलकरांना हक्काचे पाणी मिळणार असून पुढील २० वर्षांचे सुरळीत पाणी पुरवठा नियोजन होणार आहे.

पनवेलकरांचा पाणीप्रश्न कायमचा सुटावा म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा केला. पनवेल परिसरात झपाट्याने नागरीकरण होत आहे आणि त्यामुळे विविध सेवांवर त्याचा ताण येत आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढील २० वर्षांचे पाणी नियोजन होईल अशा तऱ्हेच्या कार्यवाहीची मागणी केली. त्याचा शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. या सर्वांचा फलित म्हणून या प्रकल्पातील सर्व कामे पूर्ण होऊन येत्या वर्षापासून नियमित मुबलक पाणी पुरवठा होणार आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रातील पाण्याचा तुटवडा भरून काढण्यासाठी उपयुक्त ठरणारी न्हावाशेवा पाणीपुरवठा योजनेचे काम पाईपलाईनच्या जागेतील अतिक्रमणांमुळे रखडले. याचा परिणाम योजनेच्या २२ कोटींच्या यांत्रिकी कामावर देखील झाला. ते पूर्ण झाल्याशिवाय यांत्रिकी कामे करता येणे शक्य नसल्यामुळे ही कामेदेखील वाढीव मुदतीत होणार आहेत. ३६४ कोटींची बांधकामाशी संबंधित कामे रखडल्यामुळे अवघ्या २२ कोटींच्या कामावरही याचा परिणाम झाला आहे. वयाळ आणि भोकरपाडा येथे पंपिंग मशीन, हेडवर्क्स, सबस्टेशन आदी महत्त्वाच्या कामांसह शुद्ध आणि अशुद्ध पाण्यासाठी पंपिंग मशीन, स्काडा व ऑटोमेशन यंत्रणा, एक्सप्रेस फीडर, जलशुद्धीकरण केंद्रातील यांत्रिकी कामांना विलंब झाला असला तरी या तांत्रिक बाबी दूर होऊन कामे पूर्णत्वास नेण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रयत्न मंत्रालय स्तरावर प्रयत्न केला आहे. त्यामुळे लवकरच ही योजना पूर्ण होऊन पुढील अनेक वर्षे पनवेलकरांना पाण्याचा प्रश्न उद्भवणार नाही.

# मुरूडच्या मार्केटमध्ये पापलेटची मोठी आवक

■ मुरूड

**मुरूड** मार्केटमध्ये आज पापलेटची मोठ्या प्रमाणात आवक वाढली असली तरी पापलेटचा दर ४०० ते ५०० प्रति जोडी होता. कोलंबी, छोट्या सुरमई, मांदेली, अशी मासळी असली तरी पापलेट खरेदीकडे ग्राहकांचा जास्त कल होता.

मुरूड मार्केटमधील पापलेट मासळी विक्रेती लक्ष्मी पाटील यांनी सांगितले की, गेल्या काही दिवसांनी मुरूड मार्केटमध्ये मोठ्या आकाराचे पापलेट उपलब्ध झाले आहे. त्यासोबत कोलंबी देखील मोठी आवक वाढली आहे. सकाळपासून मासळीसाठी गर्दी आहे. पापलेटच्या किमती जास्त असल्याने काहींनी छोटी पापलेट किंवा कोलंबीकडे मोर्चा वळविला.

# महा'अडाणी' आघाडीची नियत साफ नाही

■ वाशिम

**विधानसभा** निवडणुकीच्या प्रचारासाठी आज उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी पोहरादेवी येथे प्रचारसभा घेत महाविकास निशाणा साधला. मोदी सरकार सर्व घटकांचा विकास करत आहेत. दुसरीकडे काँग्रेसच्या नेतृत्वातील महाअडाणी आघाडीची नियत साफ नाही. त्यांच्या खटारा गाडीचे चाके निखळली असून त्याचे चालक होण्यासाठी मात्र त्यांच्यात चढाओढ लागली असल्याची खरमरीत टीका योगी यांनी या सभेतून केली.

कटेंगे तो बटेंगे, एक हैं तो सेफ हैं याचा पुनरुच्चार करत योगी आदित्यनाथ यांनी विरोधी नेत्यांवर टीकास्त्र सोडले. ते म्हणाले की, बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पोहरादेवीचे विकास आणि सौंदर्यीकरण कार्य आता आणखी वेगाने पुढे जाणार आहे. समाजविरोधक व देशद्रोही बंजारा समाजाची दिशाभूल करून धर्मांतरण

## योगी आदित्यनाथ यांचा हल्लाबोल

करण्याचे प्रयत्न करत होते. ते आता यशस्वी होऊ शकणार नाहीत. भारताच्या सुरक्षेचा काँग्रेसनेच खेळखंडोबा केला होता. देशात एक वेळ अशी होती की, पाकिस्तान भारतात दहशतवादी कारवाया करत होते. देशात घुसखोरी, बॉम्बस्फोट घडवून आणले जात होते. चीन भारताच्या जमिनीवर अतिक्रमण करत होता. काँग्रेसकडे कारवाईची मागणी केल्यावर त्यांच्या नेत्यांना संबंध बिघडण्याची काळजी होती. देशाची चिंता नव्हती.

# एकवेळ भाजपाला मतदान करू, पण तुतारीला नाही!

## लक्ष्मण हाकेंचे वक्तव्य

■ धाराशिव

**ओबीसी** समुदाय एकवेळी भाजपाला मतदान करेल, पण तुतारीला अजिबात करणार नाही, असे ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी स्पष्ट केले. धाराशिव येथे वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार डॉ. स्नेहा सोनकाटे यांच्या प्रचारासाठी हाके उपस्थित होते. यावेळी त्यांनी शरद पवार गटाचे उमेदवार भूषण सिंह होळकर यांचा समाचार घेतला.

लक्ष्मण हाके म्हणाले की, ज्या ठिकाणी वंचित किंवा ओबीसी आरक्षणाच्या विचाराचा उमेदवार नाही. त्या ठिकाणी आम्ही एकवेळेस भाजपाला मतदान करू. पण शरद पवार यांच्या तुतारीला मतदान करणार नाही. लोकसभा निवडणुकीत शरद पवारांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. त्यामुळे त्यांचे आंदोलन मोठे झाले. पण आता ओबीसींचे तब्बल २५ आमदार सत्तेत असतील. ओबीसी समाज यावेळी महाविकास आघाडीचा करेक्ट कार्यक्रम करणार आहे. लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाचा बदला विधानसभेला घेतल्याचे दिसेल. यावेळी ओबीसी भल्याभल्यांना आडवे केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीत. पवार सध्या होळकरांचे वंशज म्हणून कुणालाही उभे करत आहेत.

# तुम्ही पैसे खाल्ले म्हणून तुमच्या बॅगा चेक करतात

■ पालघर

**तुम्ही** पैसे खाल्ले म्हणून तुमच्या बॅगा तपासल्या जातात, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर केली आहे. महायुतीचे पालघर मतदारसंघातील उमेदवार शिवसेना उमेदवार राजेंद्र गावित यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी सभा घेतली. यावेळी बॅगांच्या तपासणीवरून शिंदेनी ठाकरेंना टोला लगावला.

ते म्हणाले की, तुम्ही सगळीकडे पैसे खाल्ले. म्हणून तुमच्या बॅगा तपासत आहेत. आमच्या पण बॅगांची तपासणी केली जाते. आम्ही व्हिडिओ काढून व्हायरल करत नाही.

यावेळी त्यांनी लाडकी बहीण योजनेवरूनही



## मुख्यमंत्री शिंदेंचा ठाकरेंना टोला

विरोधकांचा समाचार घेतला. ते म्हणाले की, सावत्र दुष्ट भावांनी माझ्या लाडक्या बहिणींचा अपमान केला आहे. लाडकी बहीण योजना बंद पाडण्यासाठी ते न्यायालयात गेले होते. पण कोणी आला, तरी योजना बंद पडू देणार नाही. मविआवाले म्हणतात, सरकार आल्यावर लाडका भाऊ, लाडकी बहीण, लाडका शेतकरी सर्वांची चौकशी करू. पण हा एकनाथ शिंदे तुमच्या पोकळ धमक्यांना घाबरत नाही. लाडक्या बहिणींसाठी एकनाथ शिंदे एकदा नाही १०० वेळा जेलमध्ये जाईल. काँग्रेसने, राजस्थान, कर्नाटक, हिमाचलमध्ये अशाच घोषणा केल्या पण सरकार आल्यावर केंद्राकडे पैसे मागायला लागले. त्यांचे नेते म्हणतात, खटखटाखट देंगे पण कधी? आम्ही पटपटापट लाडक्या बहिणींना पैसे दिले.

# कल्याण, डोंबिवलीत प्रचार! मजुरी दर ८००-१२०० रुपये

■ कल्याण

**कल्याण,** डोंबिवलीतील प्रचार मजुरी दर ८०० ते १२०० रूपयांवर पोहोचले आहेत. सुरुवातीला हेच दर ५०० ते ६०० रुपये होते.

कल्याण, डोंबिवलीतील चारही मतदारसंघातील विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता शेवटच्या टप्प्यात पोहचला आहे. या प्रचारासाठी मतदारांच्या दारापर्यंत पोहचण्यासाठी तगडी प्रचारक कार्यकर्त्यांची फौज प्रत्येक पक्षाच्या उमेदवाराकडे नाही. प्रचारात गर्दी दिसण्यासाठी उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी चाळी, झोपड्यांमधील रहिवासी, कामगार नाका मजुरांना पहिल्या दिवसापासून रोजंदारीवर घेऊन प्रचार सुरू आहे.

**मान. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-VII यांच्या समक्ष**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जीएमआर**
धर्मादाय आयुक्त भवन, पहिला मजला, सस्मिरा बिल्डींग, वरळी, मुंबई - ४०००३०.

**चौकशीची जाहीर सूचना**
**"दैया फाऊंडेशन" यांच्या प्रकरणात**
**पीटीआर क्र.** ई-३७५४१ (एम)
**बदल अहवाल क्र.** एसीसी/VII/८१२९/२०२४
**दाखल करणारेः** अमनदीप सिंग दिलिप अरोरा

प्रति,
स्वारस्य असणारे सर्व संबंधितः
ज्याअर्थी वरील न्यासाचे सूचित करणारे विश्वस्त यांनी खालील वर्णन केलेली मालमत्ता उपरोल्लेखित न्यासाच्या नोंदीवर आणण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक न्यास कायदा, १९५० च्या कलम २२ अन्वये बदल अहवाल दाखल केला आहे आणि मान. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-VII, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांच्याद्वारे चौकशी करण्यात येणार आहे म्हणजेच,

१. सदर मालमत्ता न्यासाची मालमत्ता आहे का? आणि वरील न्यासाच्या नावे नोंदणी करता येईल का?

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

१) श्री. चंद्रशेखर सुब्बय्या शेट्टी, २) श्री. अरूण सुब्बय्या शेट्टी **(विक्रेते) आणि** दैय्या फाऊंडेशन **(खरेदीदार)** यांच्या दरम्यान दि. २१ नोव्हेंबर, २००३ रोजी "अभिहस्तांतरण करार" नोंदणीकृत करण्यात आला. दस्तऐवजाच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेली मालमत्ता म्हणजेच मावळच्या नोंदणीकरण उप-जिल्ह्यामधील लोणावळा, जिल्हा-पुणे, सर्व्हे क्र. १९०, सीटीएस क्र. १५०, प्रभाग क्र. बी, भूखंड ई येथे स्थित अ-कृषिक जमीन किंवा मैदानाचे सर्व खंड आणि तुकडे, मोजमाप १४०० चौ.या., समतूल्य ११७० चौ.मी. आणि त्यावर उभी संरचना, सु. बिल्ट अप ३९०० चौ.फू. आणि त्याच्या चतुःसीमा खालीलप्रमाणेः
पूर्वेस किंवा त्या दिशेनेः सदर एन्क्लेव्हच्या भूखंड क्र. डी द्वारे, दक्षिणः ३० फूट रुंद रस्त्याद्वारे, पश्चिमेस किंवा त्या दिशेनेः ४० फूट रुंद रस्त्याद्वारे, ओ.पी.क्यू ॲण्ड आर असे चिन्हांकित उत्तरेस किंवा त्या दिशेनेः सामायिक रस्त्याद्वारे.

मान. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-VII, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांच्या समक्ष असणाऱ्या प्रकरणामध्ये तुमचे आक्षेप, जर असल्यास, सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत वरील पत्त्यावर व्यक्तिशः किंवा वकिलाद्वारे सादर करण्याची मागणी तुम्हाला करण्यात येत आहे.

माझ्या सही आणि माननीय संयुक्त धर्मादाय आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांच्या शिक्क्यासह पारित.
दि. १३ नोव्हेंबर, २०२४

शिक्का

सही/-
(प्रभारी) अधीक्षक (सं)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

# निरलॉन लिमिटेड

(सीआयएन L17120MH1958PLC011045)
**नोंदणीकृत कार्यालयः** पहाडी गाव, ऑफ वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०० ०६३.
**दूरध्वनी क्र.:** + ९१ (०२२) ४०२८ १९१९/२६८५ २२५७/५८/५९ **फॅक्स क्र.:** + ९१ (०२२) ४०२८ १९४० **ईमेलः** info@nirlonltd.com, **वेबसाइटः** www.nirlonltd.com

## वि. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि सहामाहीकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष

(₹ लाखात)

| अ. क्र. | तपशील | संपलेले त्रैमासिक | | | संपलेली सहामाही | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०-सप्टें-२४ | ३०-जून-२४ | ३०-सप्टें-२३ | ३०-सप्टें-२४ | ३०-सप्टें-२३ | ३१-मार्च-२४ |
| | | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| १ | **उत्पन्नः** | | | | | | |
| | अ) कार्यातून महसूल | १६,०२०.६१ | १५,६५०.६५ | १४,९४१.७२ | ३१,६७१.२६ | २९,७६७.३३ | ६०,३११.९८ |
| | ब) इतर उत्पन्न | २३२.३१ | १३८.६५ | ११९.६७ | ३७०.९६ | २००.३३ | ४२३.५६ |
| | **एकूण उत्पन्न** | **१६,२५२.९२** | **१५,७८९.३०** | **१५,०६१.३९** | **३२,०४२.२२** | **२९,९६७.६६** | **६०,७३५.५४** |
| २ | **खर्चः** | | | | | | |
| | अ) कर्मचारी लाभ खर्च | १४३.६१ | १३९.९९ | १३५.२४ | २८३.६० | २७५.१४ | ५३५.९३ |
| | ब) अर्थसहाय्य खर्च | २,९७३.७२ | २,९६६.९८ | ३,०२६.२९ | ५,९४०.७० | ६,०४१.०९ | १२,३४९.१३ |
| | क) घसारा आणि परिशोधन खर्च | १,४३६.६३ | १,४०९.९२ | १,३८९.४१ | २,८४६.५५ | २,७७३.४८ | ५,६४१.६४ |
| | ड) मालमत्ता व्यवस्थापन खर्च | १,३८३.१३ | १,३०४.४९ | १,२८६.२८ | २,६८७.६२ | २,३६५.१९ | ५,२६६.१८ |
| | ई) इतर खर्च | १,६३१.९० | २,१७७.७२ | १,५५५.२९ | ३,८०९.६२ | ३,५५५.९२ | ६,७८९.३३ |
| | **एकूण खर्च** | **७,५६८.९९** | **७,९९९.१०** | **७,३९२.५१** | **१५,५६८.०९** | **१५,०१०.८२** | **३०,५८२.२१** |
| ३ | **करपूर्व नफा (१-२)** | **८,६८३.९३** | **७,७९०.२०** | **७,६६८.८८** | **१६,४७४.१३** | **१४,९५६.८४** | **३०,१५३.३३** |
| ४ | **कर खर्च** | | | | | | |
| | (अ) (विद्यमान कर) | १,५१७.९८ | १,३६१.०० | १,३३९.९१ | २,८७८.९८ | २,६१३.२६ | ५,२६८.४० |
| | (ब) (स्थगित कर) | १,५१७.३१ | १,४४६.०० | १,०८०.६० | २,९६३.३१ | २,११७.१९ | ४,३२९.३१ |
| | **एकूण कर खर्च** | **३,०३५.२९** | **२,८०७.००** | **२,४२०.५१** | **५,८४२.२९** | **४,७३०.४५** | **९,५९७.७१** |
| ५ | **कर पश्चात नफा (३-४)** | **५,६४८.६४** | **४,९८३.२०** | **५,२४८.३७** | **१०,६३१.८४** | **१०,२२६.३९** | **२०,५५५.६२** |
| ६ | **इतर सर्वसमावेशक उत्पन्न** | | | | | | |
| | बाबी, ज्या नफा आणि तोटामध्ये पुन्हा वर्गीकृत होणार नाहीत (कर निव्वळ) | - | - | - | - | - | ०.१७ |
| ७ | **कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (५+६)** | **५,६४८.६४** | **४,९८३.२०** | **५,२४८.३७** | **१०,६३१.८४** | **१०,२२६.३९** | **२०,५५५.७९** |
| ८ | भरणा केलेले सम भाग भांडवल (दर्शनी मूल्य प्रति भाग ₹१०/-) | ९,०११.८० | ९,०११.८० | ९,०११.८० | ९,०११.८० | ९,०११.८० | ९,०११.८० |
| ९ | इतर इक्विटी | | | | | | २८,२९३.२४ |
| १० | **प्रति भाग उत्पन्न (ईपीएस) प्रत्येकी ₹१०/- (वार्षिकीकरण नाही)** | | | | | | |
| | अ) मूळ (₹) | **६.२७** | **५.५३** | **५.८२** | **११.८०** | **११.३५** | **२२.८१** |
| | ब) सौम्यीकृत (₹) | **६.२७** | **५.५३** | **५.८२** | **११.८०** | **११.३५** | **२२.८१** |
| | **वित्तीय निष्कर्षांसोबतच्या टिपा पहा** | | | | | | |

## रोख प्रवाहाचे अलेखापरिक्षित विवरणपत्र

(₹ लाखात)

| तपशील | वि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी संपलेली सहामाही | वि. ३० सप्टेंबर २०२३ रोजी संपलेली सहामाही |
|---|---|---|
| **परिचालित उपक्रमांपासून रोख प्रवाह** | | |
| **आयकर पूर्व नफा** | **१६,४७४.१३** | **१४,९५६.८४** |
| करिता समायोजनः | | |
| घसारा आणि परिशोधन खर्च | २,८४६.५५ | २,७७३.४८ |
| विपणन शुल्काचे परिशोधन | ९३३.०० | ८४०.२२ |
| भाडेपट्टी समानीकरण उत्पन्न | २४४.६९ | ७५.८४ |
| प्रतिभुती ठेवींच्या सवलतीवरील भाडे उत्पन्नभ | १,०२०.७२ | ८८८.३९ |
| वित्त शुल्क | ५,९४०.७० | ६,०४१.०९ |
| व्याज उत्पन्न | (३७०.९६) | (१८९.६१) |
| | **२७,०८८.८३** | **२५,३८६.२५** |
| **मालमत्तेमधील (वाढ)/घटः** | | |
| मालमत्तेमधील (वाढ)/घटः | | |
| व्यापार प्राप्ती | (१९९.२२) | (१९३.९०) |
| इतर चालू असलेली आणि चालू नसलेली आर्थिक मालमत्ता | ११८.१७ | ३२३.५० |
| इतर चालू असलेली आणि चालू नसलेली मालमत्ता | (६०९.९२) | (८१४.२३) |
| दायित्वांमधील (वाढ)/घटः | | |
| व्यापार देणी | (२१४.१२) | ६३८.९० |
| इतर चालू असलेली आणि चालू नसलेली आर्थिक दायित्वे | ३३०.६४ | ७२६.७४ |
| इतर चालू असलेली आणि चालू नसलेली दायित्वे | **८७.२२** | **(५२४.०६)** |
| तरतुदी | ४.४९ | ४.४५ |
| **परिचलनामधून / (वापरलेला) मधील निव्वळ रोख प्रवाह** | **२६,६०६.०९** | **२५,५४७.६५** |
| प्रदान केलेला आय कर | (२,९००.८९) | (२,७४६.२८) |
| **कार्यरत उपक्रमांमधून / (वापरलेला) मधील निव्वळ रोख प्रवाह** | **२३,७०५.२०** | **२२,८०१.३७** |
| **गुंतवणूक उपक्रमांमधून रोख प्रवाह** | | |
| मालमत्ता, प्लान्ट आणि इक्विपमेन्ट्स आणि सुरू असलेल्या भांडवल कामासह गुंतवणूक मालमत्ता खरेदी | (१,०९८.७२) | (३,९४५.२२) |
| प्राप्त व्याज | ३०५.११ | १८९.६१ |
| मुदत ठेवींमध्ये गुंतवणूक (निव्वळ) | (११,५०५.००) | (६०.८१) |
| **गुंतवणूक उपक्रमांमधून/मध्ये (वापरलेला) निव्वळ रोख प्रवाह** | **(१२,२९८.६१)** | **(३,८१६.४२)** |
| **वित्तपुरवठा उपक्रमांमधून रोख प्रवाह** | | |
| प्रदान केलेला लाभांश | (९,९१२.९८) | (९,९१२.९८) |
| भांडवलीकृत व्याजासह व्याज आणि इतर कर्ज घेण्याचे शुल्क | (४,९८१.८२) | (६,०१३.७१) |
| **वित्तपुरवठा उपक्रमांमधून/मध्ये (वापरलेला) निव्वळ रोख प्रवाह** | **(१४,८९४.८०)** | **(१५,९२६.६९)** |
| **रोख आणि रोख समतूल्यांमधील निव्वळ वाढ (घट)** | **(३,४८८.२१)** | **३,०५८.२६** |
| एप्रिल १ रोजी नुसार रोख आणि रोख समतूल्य (प्रारंभिक शिल्लक) | ५,३९३.१७ | १,७२५.४९ |
| **सप्टेंबर ३० रोजी नुसार रोख आणि रोख समतूल्य (अंतिम शिल्लक)** | **१,९०४.९६** | **४,७८३.७५** |

## मालमत्ता आणि वायित्वांचे विवरणपत्र

(₹ लाखात)

| तपशील | ३०-सप्टें-२४ रोजी नुसार (अलेखापरिक्षित) | ३१-मार्च-२४ रोजी नुसार (लेखापरिक्षित) |
|---|---|---|
| **मालमत्ता** | | |
| **विद्यमान नसलेली मालमत्ता** | | |
| (ए) मालमत्ता, प्लान्ट आणि इक्विपमेन्ट्स | ४१.९३ | ४२.६० |
| (बी) भांडवल वर्क-इन-प्रोग्रेस | १८२.०९ | २६१.६७ |
| (सी) गुंतवणूक मालमत्ता | १,८८,०२८.३३ | १,९०,९५३.५४ |
| (डी) वित्तीय मालमत्ता | | |
| (आय) इतर वित्तीय मालमत्ता | ९९४.१२ | ९५८.०२ |
| (ई) चालू नसलेली कर मालमत्ता (निव्वळ) | २,८४२.८१ | २,८४२.८१ |
| (एफ) इतर चालू नसलेली मालमत्ता | ८,६०९.०६ | ९,७३८.९८ |
| **एकूण चालू नसलेली मालमत्ता** | **२,००,६९८.३४** | **२,०४,७९७.६२** |
| **चालू मालमत्ता** | | |
| (ए) वित्तीय मालमत्ता | | |
| (i) व्यापार प्राप्ती | ५१९.०२ | ३१९.८० |
| (ii) रोख आणि रोख समतूल्य | १,९०४.९६ | ५,३९३.१७ |
| (iii) वरील (ii) व्यतिरिक्त बँकेतील शिल्लक | २०,९४६.१९ | ७०२.०५ |
| (iv) इतर वित्तीय मालमत्ता | २०३.९४ | २८७.३६ |
| (बी) इतर चालू मालमत्ता | २,६१७.०१ | १,१२१.८७ |
| **एकूण चालू मालमत्ता** | **२६,१९१.१२** | **७,८२४.२५** |
| **एकूण मालमत्ता** | **२,२६,८८९.४६** | **२,१२,६२१.८७** |
| **समभाग आणि वायित्वे** | | |
| समभाग | | |
| सम भाग भांडवल | ९,०११.८० | ९,०११.८० |
| इतर समभाग | २९,०१२.१० | २८,२९३.२४ |
| **एकूण समभाग** | **३८,०२३.९०** | **३७,३०५.०४** |
| **वायित्वे** | | |
| **चालू नसलेली वायित्वे** | | |
| (ए) वित्तीय दायित्वे | | |
| (i) कर्जे | १,१४,५८४.४३ | १,१४,५५७.७५ |
| (ii) इतर वित्तीय दायित्वे | १६,६७८.०८ | १६,८९५.५३ |
| (बी) तरतुदी | ३५.१४ | ३०.८४ |
| (सी) स्थगित कर दायित्वे (निव्वळ) | २२,५९४.५८ | १९,६३१.९९ |
| (डी) इतर चालू नसलेली दायित्वे | ४,०६६.२८ | ४,७४१.६० |
| **एकूण चालू नसलेली वायित्वे** | **१,५७,९५८.५१** | **१,५५,८५७.७१** |
| **चालू वायित्वे** | | |
| (ए) वित्तीय दायित्वे | | |
| (i) व्यापार देणी | | |
| सुक्ष्म उपक्रम आणि लहान उपक्रमांची एकूण थकीत देणी | ७७.६० | १५.९४ |
| सुक्ष्म उपक्रम आणि लहान उपक्रम वगळता इतर व्यापार दायित्वांची एकूण थकीत देणी | १,०४२.७५ | १,३१८.५२ |
| (ii) इतर वित्तीय दायित्वे | २३,६८३.४३ | १३,७८३.६४ |
| (बी) इतर चालू दायित्वे | ४,७७३.८९ | २,९९०.६३ |
| (सी) तरतुदी | १५.०१ | १४.८१ |
| (डी) विद्यमान कर दायित्वे (निव्वळ) | १,३१४.३७ | १,३३५.५८ |
| **एकूण चालू वायित्वे** | **३०,९०७.०५** | **१९,४५९.१२** |
| **एकूण वायित्वे** | **१,८८,८६५.५६** | **१,७५,३१६.८३** |
| **एकूण समभाग आणि वायित्वे** | **२,२६,८८९.४६** | **२,१२,६२१.८७** |
| सोबत जोडलेल्या वित्तीय निष्कर्षांच्या टिपा पहा | | |

**टिपा:**

१. दि. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि सहामाहीचे निष्कर्ष लेखा समितीद्वारे पुनरावलोकित करण्यात आले आहेत आणि कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. १२ नोव्हेंबर, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या सभेमध्ये मंजूर करण्यात आले आहेत.
२. मुख्य कार्यकारी निर्णय घेणाऱ्यांनी संसाधनांचे वाटप करण्यासाठी व कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी मूल्यमापन केल्यानुसार कंपनीने "गुंतवणूक मालमत्तांचे परवाना देणे" यास अहवालयोग्य विभाग म्हणून निश्चित केले आहे. आयएनडी एएस १०८-ऑपरेटिंग सेगमेंटनुसार दुसरा कोणताही अहवालयोग्य विभाग नाही. त्यानुसार कोणत्याही विभागाची माहिती देण्यात आलेली नाही.
३. कंपनीच्या भागधारकांनी दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेमध्ये वित्तीय वर्ष २०२३-२४ करिता प्रत्येक समभागाकरिता ₹११.०० असा एकूण ₹९,९१२.९८ लाख अंतिम लाभांश देण्यास मंजुरी दिली. सदर लाभांश दि. ३ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्रदान करण्यात आला.

संचालक मंडळाकरिता आणि त्यांच्या वतीने
**निरलॉन लिमिटेड**
**सही/-**
**राहुल व्ही. सागर**
कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी
**डीआयएनः** ३८८९८०

ठिकाणः मुंबई
दिनांकः नोव्हेंबर १२, २०२४

रामेश्वर मिडिया

नवा काळ
web:http://navakal.in | e-mail: navakal.1923@gmail.com

# चंदेरी च्वींगम

## खमकी, कणखर तरीही कूल!



अनेक मालिका, चित्रपट, नाटकांमधून अभिनेत्री **मुक्ता बर्वे** हिने संपूर्ण महाराष्ट्रातील प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. आता कलर्स मराठीवरील 'इंद्रायणी' मालिकेच्या माध्यमातून मुक्ताचे छोट्या पडद्यावर पुनरागमन होत आहे. खमकी, कणखर तरीही कूल अशी मुक्ता यात पाहायला मिळणार आहे.

**मालिकेत पुनरागमन करावेसे का वाटले?**

इंद्रायणी मालिकेतील माझी एंट्री एकदम धम्माल आहे. खूप दिवसांनी मला अशी मस्ती मजा करायला मिळते आहे. खरंतर इंदूची सतत या मालिकेत खूप परीक्षा बघितली जाते. इंदूच्या टीममधला मी असा मेंबर असणार आहे जी आनंदीची परीक्षा घेणार आहे. त्यामुळे इंदूच्या टीममधला मी अजून एक मस्तीखोर मेंबर असणार आहे असं म्हणायला हरकत नाही.

**ही भूमिका स्वीकारण्याचे खास कारण?**

नेहमीपेक्षा काहीतरी हलकं फुलकं, गंमतीशीर करायला मिळतं आहे. वेगळा गेटअप आहे, वेगळी भाषा आहे, वेगळे सहकलाकार आहेत. मालिकेचे वातावरण वेगळे आहे. एक वेगळा ट्रॅक आहे, खूप दिवसांनी टेलिव्हिजनवर अशी काहीतरी गमंत करायला मिळत आहे.

**तुझ्या लुकची देखील चर्चा आहे. त्याबद्दल सांग...?**

मी या मालिकेत नऊवारी, गॉगल आणि स्नीकर्स अशा कुल अंदाजात दिसणार आहे. खमकी, कणखर तरीही कूल असलेली मुक्ता इनामदार ही एकेकाळी बालकल्याण मंत्री आणि खो-खो खेळाडू होती. तिचं व्यक्तिमत्व गाजलेले असून ती नेहमीच आपल्या चौकस वृत्तीसाठी ओळखली जाते. तिच्या गावी येण्याने इंदूच्या आयुष्यात अनेक नव्या वळणांचा सामना होणार आहे.

**जुन्या टीमसोबत काम करून कसे वाटतेय?**


पोतडी प्रॉडक्शनच्या टीमसोबत आम्ही खूप वर्ष एकत्र काम केले आहे. त्यामुळे माझी हक्काची टीम आहे. माझा लाडका दिग्दर्शक विनोद लव्हेकर आहे. त्याची हि मालिका असल्यामुळे मला काम करायला छान वाटतं आहे. या मालिकेत तुम्हाला वेगळी मुक्ता बघायला मिळेल. मुक्ता इनामदारच्या एन्ट्रीने 'इंद्रायणी' मालिकेत कुठले नवे ट्विस्ट येणार? मुक्ताचा प्रवेश काय नवीन उलथापालथ घडवणार? हे मालिकेच्या आगामी भागात पाहायला मिळेल.

## प्रशांत दामले म्हणतायत, 'शिकायला गेलो एक'




मराठी रंगभूमीवरचा सुपरस्टार अशी ओळख असलेले अभिनेते प्रशांत दामले यांच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आहे. प्रशांत दामले आता नव्या नाटकाद्वारे पुन्हा रंगभूमीवर धुमाकूळ घालणार आहेत. 'शिकायला गेलो एक' असे त्यांच्या नवीन नाटकाचे नाव असून शुभारंभाचा प्रयोग १३ डिसेंबर रोजी होणार आहे. 'आता रंगणार नवा तास...जिथे असेल भूगोलाच्या तासाला ट्रॅव्हल व्लॉग अन् भाषेच्या उजळणीचा आगळा वेगळा रॅप! श्याम आणि मास्तरांची ही आगळी वेगळी शिकवणी लवकरच येतेय, तुमच्या जवळच्या नाट्यगृहात...' असे म्हणत प्रशांत दामले यांनी या नाटकाचे पोस्टर शेअर केले आहे. या नाटकात प्रशांत दामले यांच्यासोबत अभिनेता ऋषिकेश शेलार मुख्य भूमिकेत आहे. द. मा. मिरासदार यांच्या कथेवर आधारित हे नाटक असून त्याचे दिग्दर्शन अद्वैत दादरकर यांनी केले आहे.

## विकी कौशल बनणार भगवान परशुराम




बॉलिवुड अभिनेता विक्की कौशल अलीकडे बहुतांश निर्मात्यांची पहिली पसंत बनला आहे. यामुळे त्याच्याकडे नवनवे चित्रपट येत आहेत. त्याचे चाहतेही यामुळे खुश आहेत. आता तो भगवान परशुरामांची भूमिका करणार आहे. एकीकडे तो भन्साळींच्या 'लव्ह अँड वॉर' सिनेमाच्या शूटमध्ये व्यस्त असतानाच त्याला हा बिग बजेट सिनेमा मिळाला आहे. विकी कौशलला एखादा धार्मिक सिनेमा करायची इच्छा होतीच. त्यातच त्याला हा सिनेमा मिळाला. म्हणून तो नकार देऊ शकला नाहीये. निमार्ते दिनेश विजन हा सिनेमा बनवणार आहेत. त्यांनी विकीला परशुरामांची कथा ऐकवली तेव्हा विकी खुशच झाला. 'महावतार' असे या सिनेमाचे नाव असून अमर कौशिक हे त्याचे दिग्दर्शन करणार आहेत. 'लव्ह अँड वॉर'चे शूटिंग पूर्ण झाल्यावर विकी याचे चित्रीकरण सुरू करणार आहे. म्हणूनच पुढच्या वर्षी हा सिनेमा सेटवर जाईल असे कळते.

## अक्षयकुमारने आणखी एक सिक्वल गमावला



अभिनेता अक्षयकुमार बऱ्याच काळापासून सुपरहीट सिनेमाच्या प्रतीक्षेत आहे. आत्ताच त्याने सलग १० फ्लॉप चित्रपट दिले आहेत. एकीकडे त्याने गाजवलेल्या 'भुलभुलैय्या'चे दोन्ही सिक्वल कार्तिक आर्यनने हिसकावले असतानाच आणखी एका सुपरहीट सिनेमाच्या सिक्वलमधून अक्षयची दांडी गुल झाली आहे. होय मंडळी, 'सिंह इज किंग' या सिनेमाच्या सिक्वलचे काम सुरू झाले असून त्यात अक्षयकुमार नाहीये हे नक्की झाले आहे. मूळचा हा सिनेमा २००८ साली आला होता. मात्र दुसरा भाग बनवताना निर्माते शैलेंद्र सिंह यांना अक्षयऐवजी रणवीर सिंह हवा आहे. तशी इच्छा त्यांनी नुकतीच व्यक्त केली आहे. रणवीर नसेल तर त्यांना दिलजीत दोसांझ चालेल, पण अक्षय नकोय.



## प्रभासच्या स्पिरीटचा मुहुर्त ठरला

साऊथ इंडस्ट्रीसह बॉलीवूड गाजवणारा बाहुबली अभिनेता प्रभास आता आपल्या आगामी चित्रपटासाठी सज्ज झाला आहे. त्याची मुख्य भूमिका असलेल्या स्पिरिट या चित्रपटाच्या शूटिंगला तो पुढच्या महिन्यापासून सुरुवात करणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संदीप वांगा रेड्डी दिग्दर्शित या चित्रपटाचा मुहूर्त शॉट प्रभास पुढच्या महिन्यात शूट करणार आहे. ॲनिमल चित्रपटाच्या तुफान याच्यानंतर संदीप वांगा रेड्डी यांचा हा पुढचा चित्रपट आहे सध्या या चित्रपटाच्या स्क्रिप्ट आणि म्युझिकवर काम सुरू आहे.




## करण - अर्जुनसाठी हृतिक मैदानात!

जुने गाजलेले चित्रपट पुन्हा रिलीज करण्याचा ट्रेंड बॉलीवूडमध्ये सध्या वाढतोय. याच यादीत आता राकेश रोशन यांचा गाजलेला क्लासिक चित्रपट करण - अर्जुन देखील समाविष्ट झाला आहे. येत्या २२ नोव्हेंबर पासून करण अर्जुन पुन्हा मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला असून शाहरुख खान, सलमान खान आणि हृतिक रोशन यांनी त्यासाठी व्हॉइस ओव्हर केले आहे. हृतिक रोशन याने अभिनेता होण्यापूर्वी वडील राकेश रोशन यांच्या काही चित्रपटांमध्ये असिस्टंट डायरेक्टर म्हणून काम केले आहे त्यापैकी हा एक चित्रपट आहे.



## दीपिकाच्या लेडी सिंघमवर बनणार संपूर्ण चित्रपट



रोहित शेट्टी यांच्या कॉप युनिवर्समधील 'सिंघम रिटर्न'मध्ये दीपिका पदुकोण हिने छोटासा रोल केला होता. यातल्या दीपिकाच्या व्यक्तिरेखेवर आता संपूर्ण चित्रपट बनणार आहेत. रोहित शेट्टी यांनीच त्याबाबतचे संकेत दिले आहेत. रोहित यांच्या कॉप युनिवर्समध्ये दीपिका प्रथमच दिसली. रोहित दीपिकाच्या लेडी सिंघम लुकवर एवढे खुश झालेत की या रोलवर पूर्ण सिनेमा बनवायचं त्यांनी ठरवलं आहे. ते म्हणाले, दीपिकाच्या शक्ती शेट्टी या रोलवर पूर्ण सिनेमा होऊ शकतो. पण तशी कहाणी आणि तसा दिग्दर्शक मिळायला हवा, असेही त्यांनी स्पष्ट केले. रोहित शेट्टी पुढे म्हणाले की, आमच्या या कॉप युनिवर्समध्ये अजून लेडी कॉप आलेली नाही. अक्षयकुमारचा 'सूर्यवंशी' करतानाच लेडी कॉपचा सिनेमा बनवण्याचा माझा विचार होता, पण आता मी ते अमलात आणणार आहे, असेही ते म्हणाले.

## सलमान पुन्हा करणार कॅमिओ




अजय दवगणच्या 'सिंघम अगेन' सिनेमात पाहुण्या भूमिकेत चमकल्यानंतर सुपरस्टार सलमान खान पुन्हा एकदा कॅमिओ भूमिकेत दिसणार आहे. अभिनेता वरुण धवन याने आपल्या 'बेबी जॉन' या सिनेमात भाईजानच्या पाहुण्या भूमिकेबाबत नुकतेच कन्फर्म केले. कलीस यांचे दिग्दर्शन असलेला हा सिनेमा २५ डिसेंबरला प्रदर्शित होणार आहे. सलमानबद्दल आतापर्यंत फक्त बोलले जात होते, पण वरुणने सोशल मीडियावर ते जाहीरच केले आहे. सल्लूच्या चाहत्यांना हे कळताच त्यांच्यात मोठा उत्साह संचारला. एका सेशनमध्ये एका चाहत्याने वरुणला विचारले, भाईचा कॅमिओ किती मिनिटांचा आहे? त्यावर वरुण म्हणाला, किती मिनिटांचा ते सांगणार नाही, पण हा कॅमिओ धमाकेदार असेल हे नक्की, असे त्याने स्पष्ट केले. नुकताच काही दिवसांपूर्वी या सिनेमाचा टेस्टर कट सोशल मीडियावर दाखल झाला आहे. यात वरुण धवनची दमदार ॲक्शन पाहायला मिळते. त्यातल्या वरुणच्या लुकनेही सिनेमाबद्दलची उत्सुकता वाढली आहे.

## 'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज'चा ट्रेलर प्रदर्शित



'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज' या चित्रपटाचा भव्य ट्रेलर रसिकांच्या भेटीला आला आहे. नुकताच या चित्रपटाचा दिमाखदार ट्रेलर लाँच सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याचा शुभारंभ चित्रपटातील 'राजं संभाजी' या गाण्याच्या नृत्याने झाला. हा भव्य चित्रपट हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित होणार असून, छत्रपती संभाजी महाराजांच्या अद्वितीय शौर्याचा आणि त्यागाचा सन्मान करणारा आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांना भव्यदिव्य स्वरूपात मांडण्यात आले आहे. या चित्रपटात ठाकूर अनुप सिंग, अमृता खानविलकर, किशोरी शहाणे, भार्गवी चिरमुले, मल्हार मोहिते-पाटील, संजय खापरे, पल्लवी वैद्य, कमलेश सावंत, विनीत शर्मा, प्रदीप रावत, प्रदीप कब्रा, राज जुत्शी प्रमुख भूमिकेत पाहायला मिळतील. हा चित्रपट येत्या २२ नोव्हेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१०७५



**आडवे शब्द –**

१. टिंगल, कुचेष्टा, टवाळी ३. संत तुकाराम यांचा प्रसिद्ध अभंग 'जेथ जातो तेथे तू माझा xxx' ५. मूर्ख १०. हिंदीत पाचू ११. माणूसघाणा, घरातच राहणारा १३. शिवाजीमहाराजांचे बालपणीचे पुण्यातील घर १५. चरबी १७. फिर्याद १९. म्हैस २०. प्रवासाला निघणे २२. गय, दया २३. होऊन गेलेले २४. चावा, डंख २५. सख्खे भावंड २७. विस्मित २८. सांड, वळू २९. चांगला, सभ्य ३२. आक्रमण ३३. नेहमी थापा मारणारा ३६. ठार करणे ३८. कृतघ्न ४०. प्रघात ४१. सुवर्ण ४२. निकाल, शेवटचे टोक ४३. तुळशीची माळ धारण केलेला, भागवतधर्माचा अनुयायी ४५. गोणपाट ४६. पार्वती ४८. श्रीकृष्ण ५०. बूज, पत्रास ५१. सुपारीचा तुकडा ५२. सुगंध, परिमल ५३. उत्कट इच्छा ५४. उपवासाला न चालणारा लाल, केशरी कंद ५६. वजनदार ५७. थर ५८. बन, मोहरी ५९. ठक, लबाड ६१. मित्र ६३. दुष्ट बेत ६४. मंदिर ६५. जातिवंत घोडा ६७. उफराटे, अपेक्षेपेक्षा निराळे ६९. कुशल, कसबी ७१. मोडलेले ७२. तंतू, वायर ७३. वायस, कावळा ७४. सोंगटी, सगळी, सर्व ७५. जिज्ञासू ७७. गलबत ७९. वृद्धी ८०. पेच, खेळी, चाल ८१. परीक्षा ८२. असीम, अमर्याद ८३. फिकीर ८४. खाट ८५. पंगतीत अन्न वाढणारा सेवक ८६. फैसला ८७. कुबेराची सून, एक अप्सरा ८९. घ्राणेंद्रिय ९०. पेंग ९२. पुन्हा पुन्हा ९३. स्वर्गातून गंगा आणणारा राजा ९५. सूर्योदयाच्या पूर्वीची वेळ ९६. अंबुज, कमळ, भारताच्या एका माजी दिवंगत पंतप्रधानांचे नाव ९७. अडथळा ९८. मौज, बहार

**उभे शब्द –**

१. उदासीनता २. जोरात दूर फेकणे ३. हरीण, याचे शिंग सूज आलेल्या भागावर उगाळून लावतात ४. मोठे वाहन ६. श्रीकृष्ण ७. साधुवाण्याची बायको ८. युद्ध ९. दिवंगत १२. बेपर्वा, बेदरकार १४. लागून असलेले, शेजारी १६. कोकणातला न्याहारीचा एक पदार्थ १८. सातू २०. आमिष, लालूच २१. आक्रोश २३. बुद्धिमत्ता २४. साष्टांग नमस्कार २५. मसलत २६. सरकारी कचेरीत होणारा विलंब २७. कबर ३०. साखळीला टांगलेला दिवा ३१. ऐहिक सुखांचा मोह ३२. हुकूमशाही वृत्ती ३४. बाह्य, परका ३५. लांब पल्ल्याची तलवार ३७. प्रयत्न ३९. ज्वालाग्राही पदार्थ ४४. ओठ ४६. राक्षसी, खुनशी ४७. नमुनेदार ४९. धातूची कांब ५१. साखरेचा फार प्रक्रिया न केलेला प्रकार ५५. अतिशय अचूक ५८. भयभीत, व्याकूळ ५९. प्रथा ६०. सूर्य ६२. खात्री करून घेणे ६३. मार्गातील अडचण दूर करणे, निर्मूलन ६६. पुष्टी ६८. शस्त्राची मूठ ७०. ज्वर मोजण्याचे साधन, थर्मामीटर ७४. प्रामाणिक व्यक्ती ७५. चारी बाजूंना पडवी (चौक) असलेला भव्य वाडा ७६. पर्यटन, सैर, ट्रीप ७८. मदतीचा हात, योगदान ८०. वरवरची, किरकोळ दुरुस्ती ८१. गहिवर ८२. नोकरीच्या शोधात असलेला ८५. स्त्रियांचा दंडावरचा दागिना, बाजूबंद ८६. घर, सदन ८७. विविधरंगी ८८. नीज ८९. अपशकुन ९१. शरीरावरील बारीक केस, रोम ९३. ऐश्वर्य, भाग्य ९४. किनारा, काठ •

**नवाकाळ कोडे क्रमांक १०७४ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. शास्त्र २. जोम ३. धूप ६. शिशुपाल ९. दिवस १२. हाकेसरशी १५. गाडीवान १७. नवरोज २०. सर २१. रमताराम २४. दव २५. खबरदारी २८. फूस लावणे २९. तोवर ३०. अथवा ३३. चाटण ३४. लाख ३५. दाणादाण ३६. युवावस्था ३९. चणे ४०. असत्य ४१. कुचीपुडी ४२. नावलौकिक ४६. लाठी ४७. शची ४८. कोपरी ४९. नवागत ५१. सैंधव ५३. दारू ५४. विपन्न ५५. खा खा ५६. वामा ५८. सुंदर ६०. कातर ६२. पक्ष ६४. शत ६५. अधर ६७. मेखला ६८. परा ७०. कल्प ७२. रावा ७३. भरकटलेला ७६. विणकाम ७८. बदला ८०. जागा ८२. कला ८३. कृषक ८५. पचका ८७. फिदा ८९. पळी ९१. खोळ ९२. शपथ ९४. मफलर ९६. सासरा ९८. पंच ९९. ललाट १००. वनिता १०१. खमक्या १०२. कढ १०५. मख्ख १०६. कपटा १०८. काटकसर ११२. कागाळी ११३. दळण ११४. शेळपट ११५. समंजस

**उभे शब्द :** १. शालीन ३. महा ४. धूसर २. पर ७. शुष्कता ८. लगाम ९. दिवाळसण १०. वन ११. बरोबर १३. केसरी १४. शीर १६. गोवणे १८. वखवख १९. जर २२. मठ्ठ २३. राडा २४. दवडणे २६. दाक्षिणात्य २७. साथ २८. फूट २९. तोलामोलाचा ३०. अणकुचीदार ३१. वायुपुत्र ३२. द्रव ३५. दासबोध ३७. वाडी ३८. स्थानापन्न ३९. चकवा ४३. वरी ४४. किनखाप ४५. ऊतमात ४८. कोपर ५०. गवा ५२. वसुंधरा ५४. वितरक ५७. मतलब ५९. दरवाजा ६१. दाखला ६३. क्षपणक ६४. शक ६६. लोभ ६७. मेलेला ६९. राका ७१. पदपथ ७४. रस्सी ७५. टकळी ७६. विषण्ण ७७. मचूळ ७९. लाच ८१. गाफिल ८४. कृश ८६. कामला ८८. दारवटा ८९. पडता काळ ९०. खसखस ९१. खोचक ९३. पटू ९५. फटकळ ९७. रामरस ९९. लख्ख १०३. ढब १०४. बोका १०५. मळी १०७. पण १०९. टप ११०. कट १११. गूज

# इंदिरा गांधी स्वर्गातून आल्या तरी ३७० कलम पुन्हा आणू शकणार नाही

पान १ वरून

काश्मीरमध्ये राहुल गांधी यांनी ३७० कलम पुन्हा आणण्याचा प्रस्ताव दिला आहे. आम्ही काश्मीरमध्ये ३७० कलम पुन्हा आणणार नाही. इंदिरा गांधी स्वर्गातून आल्या तरी त्या ३७० कलम पुन्हा आणू शकणार नाहीत. सुशीलकुमार शिंदे केंद्रीय गृहमंत्री असताना काश्मीरच्या लाल चौकात जाण्यास घाबरत होते. आता मी केंद्रीय गृहमंत्री आहे. सुशीलकुमार शिंदे यांनी काश्मीरमध्ये जावे. तुमच्या केसाला कोणीही धक्का लावू शकत नाही. सोनिया गांधी आणि मनमोहनसिंग सरकार असताना काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ले आणि बॉम्बस्फोट होत होते. मात्र नरेंद्र मोदी यांनी पुरी आणि पुलवामा हल्ल्यानंतर १० दिवसांत सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईक करून देश सुरक्षित केला. मनमोहन सरकार असताना देशाची अर्थव्यवस्था ११ व्या स्थानावर होती. मात्र त्यानंतर नरेंद्र मोदी यांनी १० वर्षांत ती ५ व्या क्रमांकावर आणली. २०२७ मध्ये भारताची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर येणार आहे. काँग्रेसने रामजन्मभूमीचा प्रश्न ७० वर्षे लटकवला. मात्र नरेंद्र मोदी यांनी हा प्रश्न सोडवत राम मंदिरची प्राणप्रतिष्ठा केली.

# तुतारी म्हणजे चिलीम! मुल्लांचे वादग्रस्त वक्तव्य

**मुंब्रा** – मुंब्रा येथे प्रचारसभेत आज अजित पवार गटाचे उमेदवार नजीब मुल्ला यांनी शरद पवार गटाच्या चिन्हाबाबत वादग्रस्त वक्तव्य केले. नजीब मुल्ला यांनी तुतारीचा चिलीम म्हणून उल्लेख केला. तुतारी ही तुतारी नसून चिलीम आहे, असे विधान नजीब मुल्ला यांनी केले. यामुळे वातावरण तापले असून, चिलीम या शब्दावर शरद पवार गटाकडून आक्षेप घेतला आहे. या मतदारसंघात शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड आणि अजित पवार गटाचे नजीब मुल्ला यांच्यात लढत होणार आहे.

# कोकणाचे अदानीकरण होऊ देणार नाही

पान ८ वरून

छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेला सिंधुदुर्ग किल्ला ऊन, वारा, पाऊस, लाटा यांचा सामना करूनदेखील तसाच उभा आहे. आणि दाढीवाले म्हणतात काय करणार वारा एवढा जोरात होता की पुतळा पडला. असे सांगताना त्यांना लाज वाटायला पाहिजे. आपले इथले जे आमदार आहेत, ते खाली मुंडी पाताळ धुंडी आहेत. ते तर म्हणतात की, वाईटातून काही तरी चांगले होते. अरे महाराजांचा पुतळा पडला त्यात चांगले काय होणार आहे? तुमच्या डोक्यात मेंदू आहे की कचरा? त्यातून काही चांगले होणार नाही, पण केसरकर पडल्यानंतर सिंधुदुर्गमध्ये चांगले होणार आहे. भाजपाचे लोक काही दिवसांपूर्वी कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग सीमेवर अदानीच्या गोल्फ कोर्ससाठी जागा शोधत होते, अशी माझ्याकडे माहिती आहे. हे लोक अदानीचे दलाल बनून माझ्या कोकणात येतात, कोकणवासीयांना फसवतात. कोकणवासीयांच्या जागा ओरबाडून अदानीच्या चरणी वाहत आहेत. आपल्या हक्काची मुंबई अदानीच्या घशात घातली. आमचे सरकार आल्यानंतर अदानीच्या घशात घातलेली मुंबई परत काढू. माझ्या गिरणी कामगारांना तिथे परवडणाऱ्या किमतीत घर देऊ. सबका मालिक एक असे साईबाबांनी सांगितले होते. पण भाजपावाले म्हणतात सबका मालिक अदानी. माझ्या कोकणाचे अदानीकरण मी होऊ देणार नाही. लोकसभेत फटके पडल्यानंतर यांना माता-भगिनी, शेतकऱ्यांची आठवण आली. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून दाखवू म्हणत आहे. पण आम्ही कर्जमुक्त करून दाखवले आहे. अडीच वर्षांत सरकार पाडले नसते, तर परत करून दाखवले असते. आमचे सरकार आल्यानंतर पुन्हा एकदा कर्जमाफी करणार आणि कोकणात चांगले हॉस्पिटल उभारणार.

ते पुढे म्हणाले की, लोकसभेला नको तो माणूस तुम्ही तुमच्या डोक्यावर पुन्हा का बसवून घेतला. आपले कोकण म्हणजे आयुष्य आहे. त्या गुंडांच्या हातात देऊ नका. या कोकणात पूर्वी दहशत होती. भयाण वातावरण होते. हे तुम्ही विसरलात का? कोकण पुन्हा भरारी घेईल असा विश्वास आहे. त्यामुळे हा कोकण दरोडेखोरांच्या हातात द्यायचा का याचा विचार करा. सध्याची स्थिती बघवत नाही. हे (केसरकर आणि नारायण राणे) शिवद्रोही आहेत. ते महाराष्ट्रद्रोही आहेत.

यावेळी बंडखोरांनाही ठाकरेंनी यावेळी ठणकावले. ते म्हणाले, बंडखोरी करणे म्हणजे ही महाराष्ट्रद्रोह आहे. अजूनही वेळ गेली नाही. बरोबर या.

# शरद पवारांचे फोटो, व्हिडिओ वापरू नका! अजित पवार गटाला कोर्टाचे निर्देश

पान १ वरून

यावेळी सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी, व्हिडिओ जुना असेल किंवा काहीही असले तरी तुम्ही शरद पवारांचा चेहरा का वापरता? तुमच्या सगळ्या उमेदवारांनी शरद पवारांचे फोटो, व्हिडिओ कशाला वापरले पाहिजेत? जर तुमचे वैचारिक मतभेद आहेत, तर तुम्ही तुमच्या पायावर उभे राहिले पाहिजे, असे अजित पवार गटाला खडसावले.

त्याच वेळी सर्वोच्च न्यायालयाने शरद पवार गटाच्या वकिलांच्या मागणीवर टिप्पणी केली की, शरद पवार स्वतः अजित पवारांच्या विरोधात प्रचार करत आहेत ना? महाराष्ट्रातील लोकांना दोघांमधील भांडण माहिती नसेल, असे तुम्हाला वाटते का? दोन्ही गट प्रत्यक्ष एकमेकांच्या विरोधात अनेक जागांवर लढत आहेत. लोकांना हे स्पष्ट माहिती आहे. यावर आधीच आदेश पारीत करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील सुनावणी मंगळवार १९ नोव्हेंबरला होणार आहे.

**TENDER NOTICE**
Sealed Item Rate tenders are invited for Civil & Structural Repairs, Waterproofing, Plumbing & Painting Work of
**CHANDIVALI SWAPNAPURTI CHSL**
Mhada Colony, Chandivali, Powai, Mumbai - 400072.
Tender forms are available from
**VERSATILE CONSULTING ENGINEERS**
230/250, Arun House, Ground floor, RSC - 46, Gorai-2, Borivali (West), Mumbai - 400 091.
Tel: 9920115458 / 9029869000
From - **14.11.2024** to **27.11.2024**
Time:- 11.00 a.m to 5.00 p.m
Cost of tender document Rs. 5,000/- payable by Pay Order in favour of society.
(Non Refundable)

# राज्यात बॅग तपासणीचा धडाका नेत्यांच्या सामानात चकली, भेळ

पान १ वरून

यवतमाळ जिल्ह्यात आणि ५ नोव्हेंबर रोजी कोल्हापूर विमानतळावर देवेंद्र फडणवीस यांच्या बॅगेची तपासणी झाली होती. पण, त्यांनी ना कोणता व्हिडिओ काढला, ना कोणती आगपाखड केली. काही नेत्यांना तमाशा करण्याची सवयच असते. दरम्यान, आज नांदेडमध्येही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बॅगेची तपासणी केली. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पालघर दौऱ्यावर असताना निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या बॅगांची तपासणी केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी, बॅगेत फक्त कपडे आहेत, बाकी काही नाही. युरिन पॉटही नाही, असे म्हणत उद्धव ठाकरे यांना चिमटा काढला. तर बारामतीत निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी अजित पवारांच्या हेलिकॉप्टरची तपासणी केली. यावेळी अजित पवारांच्या बॅगेत चकली, चिवड्याची पाकिटे सापडली. त्यानंतर निवडणूक अधिकारी जेव्हा डब्बा त्यांच्या बॅगेत ठेवत होते, त्यावेळी अजित पवारांनी स्वत:हून त्यांना तो तपासायला दिला. त्यामध्ये लाडू होते. आता त्यांचा हा गमतीदार व्हिडिओ सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. तसेच सात दिवसांपूर्वी मनसे प्रमुख राज ठाकरे लातूर दौऱ्यावर होते तेव्हा त्यांची बॅग विमानतळावर तपासण्यात आल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

आज पुण्यातून हेलिकॉप्टरने सोलापूर जिल्ह्यातील सांगोला मतदारसंघात शहाजीबापू पाटील यांच्या प्रचारार्थ सांगोला महाविद्यालय येथील हेलिपॅडवर केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे हेलिकॉप्टर उतरले असता निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांनी त्याची तपासणी केली. यावेळी आठवले यांच्या सोबत एकही बॅग नव्हती. फक्त भेळ आणलेली कागदी पिशवी होती. दरम्यान, सत्ताधारी प्रचारासाठी फक्त खाण्या-पिण्याच्याच गोष्टी घेऊन जातात का, अशी मजेशीर चर्चा आता रंगली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आज लातूरमध्ये महाविकास आघाडी उमेदवार यांच्या जाहीर सभेसाठी आले होते. यावेळी खरगे हे विमानतळावर उतरल्यानंतर त्यांच्या बॅगेची निवडणूक आयोगाच्या पथकाने तपासणी केली. तर यवतमाळमध्ये निवडणूक आयोगाच्या तपासणी पथकाचा फज्जा उडाला. कारण काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची बॅग तपासणीसाठी अधिकारी आले होते, पण त्यांनी बॅगच आणली नव्हती. यावेळी पटोलेंनी सर्व तपासून घ्या काय सापडते का, असा टोला लगावला.

# भाजपाच्या 'बुलडोझर मुख्यमंत्री' ना दणका

पान १ वरून

असते. घर पाडण्याआधी संबंधित व्यक्तीला द्यावयाच्या नोटीसीबद्दलही न्यायालयाने आज निकषच स्पष्ट केले. घर पाडण्याची कारवाई करायची असेल तर संबंधित व्यक्तीला १५ दिवस आधी नोटीस पाठवली पाहिजे. ही नोटीस रजिस्टर एडीनेच पाठविली गेली पाहिजे. ती नोटीस संबंधित व्यक्तीला पंधरा दिवस आधी प्राप्त झाली आहे याची पावती घेणे आवश्यक आहे. यामुळे त्याला कोर्टात दाद मागायची असल्यास पुरेसा वेळ मिळेल. या नोटिशीची एक प्रत संबंधित व्यक्तीच्या घराच्या भिंतीवर बाहेरच्या बाजूला ठळकपणे दिसेल अशा पद्धतीने चिकटवणे आवश्यक आहे. नोटिशीमध्ये घर का पाडले जाणार आहे याची कारणे स्पष्टपणे नमूद केली जावीत. त्याव्यतिरिक्त घर पाडण्याच्या कारवाईचे व्हिडिओ चित्रण केले गेले पाहिजे. ज्यात कारवाई करणारे अधिकारी दिसतील. जर कारवाई बेकायदा ठरली तर या अधिकाऱ्यांकडून नुकसानीची भरपाई केली जाईल. त्याचबरोबर जर या निकषांचे उल्लंघन झाले तर तो न्यायालयाचा अवमान मानला जाईल, अशी तंबीही न्यायालयाने दिली.

सर्वसामान्य माणसांसाठी स्वतःचे घर बांधणे हे एक मोठे स्वप्न असते. ते सत्यात आणण्यासाठी अनेक वर्षांची मेहनत लागते. एका कुटुंबाच्या आशा-आकांक्षा त्या घराशी निगडित असतात. त्यामुळे एखाद्याचे घर पाडायचे असेल तर अधिकाऱ्यांना हे दाखवावे लागेल की ही कारवाई हाच एकमेव पर्याय होता,असेही न्यायालयाने बजावून सांगितले. या निर्णयामुळे बुलडोझर कारवाईला ब्रेक लागणार आहे.

# देशमुखांना क्लीनचिट नाही! फडणवीस टार्गेट

## नव्याने सीबीआय चौकशी करा - देवेंद्र फडणवीस

न्या. चांदिवाल यांच्या या गौप्यस्फोटानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे, असे सांगत या प्रकरणाची नव्याने सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली. 'आरोपी आणि साक्षीदार यांची भेट स्वत: पोलीस उपायुक्त घडवून आणत होते, असे न्या.चांदिवाल म्हणतात. हा मविआ सरकारच्या भ्रष्टाचाराचा ढळढळीत पुरावा आहे. हे प्रकरण आता अत्यंत गंभीर बनले आहे. याची पुन्हा नव्याने सीबीआय चौकशी झाली पाहिजे',असे फडणवीस म्हणाले.

पान १ वरून

त्या माहितीची सत्यता पटवता येईल असे भक्कम पुरावे त्यांनी माझ्यासमोर आणले नाही. त्यांनी शपथपत्रावर अजित पवार आणि शरद पवार यांची नावे घेतली. पण साक्षीत त्यांची नावे घेतली नाहीत. तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी केलेले बहुतांश आरोप ऐकीव स्वरूपाचे होते. अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये अनिल देशमुख कसा हस्तक्षेप करतात याच्या तक्रारी त्यांच्याकडे अनेक कनिष्ठ अधिकाऱ्यांनी केल्याचे त्यांनी सांगितले. पण ते आरोप सिध्द करण्यासाठी कागदोपत्री पुरावे त्यांनी दिले नाहीत. त्यामुळे मी अनिल देशमुख यांच्याविरुध्द ठोस पुरावे नाहीत, एवढेच अहवालात म्हटले. मी कुठेही ते निर्दोष आहेत असे म्हटलेले नाही. किंवा त्यांना क्लीनचिट दिलेली नाही, असे न्या. चांदिवाल म्हणाले. माझ्यासमोर जे काही चालले होते ते मला स्पष्ट दिसत होते. कुठे तरी पाणी मुरत आहे हे मला समजत होते. मात्र कोण कोणाला वाचवायचा प्रयत्न करीत आहे हे समोर येत नव्हते. 'तेरी भी चूप, मेरी भी चूप,' असा सारा प्रकार माझ्यासमोर सुरू होता. ठाण्यातील एका पोलीस उपायुक्त व एक वकील हे समितीच्या कामात वारंवार हस्तक्षेप करीत होते. परमवीर सिंग आणि वाझे यांची भेट झाली, अनिल देशमुख आणि वाझे यांचीही भेट झाल्याचे कळले असा आरोप न्या. चांदिवाल यांनी केला.

## सलिल देशमुखांचा मेसेज

चौकशी दरम्यान सचिन वाझे यांनी मला पुरावा म्हणून अनिल देशमुख यांचे पुत्र सलिल देशमुख यांचा एक व्हॉट्सअ‍ॅप मेसेज दाखविला. त्यामध्ये ४० लाख रुपयांच्या व्यवहाराचा उल्लेख होता. पण तो ठोस पुरावा ठरू शकला नसता म्हणून मी ते रेकॉर्डवर घेतले नाही, असे न्या.चांदिवाला यांनी सांगितले. त्यामुळे न्या. चांदिवाल हे अनिल देशमुख यांना टार्गेट करू पाहात आहेत, असे चित्र निर्माण झाले. कारण ज्या व्हॉट्सअ‍ॅप मेसेजचा पुरावा म्हणून उपयोग होणार नाही हे माहिती होते त्या मेसेजबद्दल न्या. चांदिवाल का बोलले हा सवाल उपस्थित होतो.

# झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यासाठी ६४ टक्के उत्साही मतदान

पान १ वरून

चंपाई सोरेन, मीरा मुंडा, गीता कोडा, पूर्णिमा साहू, मंत्री मिथिलेश ठाकूर, झारखंड मुक्ती मोर्चाचे राज्यसभा खासदार महुआ माझी हेही निवडणूक लढवत आहेत. आज ४३ जागांवर मतदान झाल्यानंतर उर्वरित ३८ जागांवर २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चाने सर्वाधिक २९ जागा जिंकल्या होत्या. त्यावेळी भाजपाने २५ जागा मिळवल्या होत्या. काँग्रेसच्या १८ जागा होत्या. त्यानंतर जेएमएम व काँग्रेस, राजद यांनी सरकार बनवले होते. मध्यंतरी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन काही काळ तुरुंगातही होते. या निवडणुकीचा निकाल महाराष्ट्राबरोबरच म्हणजे २३ नोव्हेंबरला लागणार आहे.

**PUBLIC NOTICE**
Shreepati Aradhana Bhanji Bhimji 'C' CHS Ltd. Regd. No. Mumbai/W-C/HSG/ (TC)/9522/2018-19, Year 2018 Dated 14.05.2018. C Wing, 1st Floor, Near Kabutar Khana, CS No. 2324(PT), 2325(PT), Bhuleshwar Road, Mumbai-400 002, occupant late Mrs. Arunaben Kirtanlal Shah was joint member with her son Mr. Yogesh Kirtanlal Shah of Flat No.C-2106, 21th floor, holding Share Certificate No.157, bearing distinctive nos. 1561 to 1570. Mrs. Arunaben Kirtanlal Shah expired on 21.09.2020 without making Nomination/will, Joint Member Mr. Yogesh Kirtanlal Shah has applied to the Society to transfer 50% share of deceased member to his name. He has submitted Affidavit as per the law.
The Society hereby invites claims, objections from any other heirs or other claimants/objector if any, within a period of 15 days from publication of this notice.
**For SHREEPATI ARADHANA BHANJI BHIMJI 'C' CHS LTD..**
**Sd/-**
**SECRETARY**
Time 1pm to 5pm

**जाहीर सूचना**
येथे सर्वसामान्य जनतेस मोठ्या प्रमाणात सूचना देण्यात येत आहे की, आम्ही, **सुश्री माया किशोर शिवानी** (उर्फ श्रीमती माया अडवाणी) (दिवंगत किशोर मोतीराम शिवानी आणि सौ. रीता किशोर शिवानी यांची मुलगी) त्यांचा पत्ता फ्लॅट क्र.५२२-१, रहेजा क्रेस्ट ३, लिंक रोड समोर, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५३ **(मालक)** येथे लिहिलेल्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात **(मालमत्ता)** यांच्या शिर्षकाची चौकशी करत आहोत.
कोणतीही आणि सर्व व्यक्तीस वारसा, वाटा, विक्री, गहाण, हस्तांतरण, विकास हक्क, लीज, उप-लीज, परवाना, उप-परवाना, भाडेकरू, उप-भाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, शुल्क, विश्वास, देखभाल, आराम, भेट, योजना, मृत्युपत्र, देवाणघेवाण , ताबा, संलग्नक, गहाण किंवा अधिभार किंवा अन्यथा कसेही किंवा कोणत्याही स्वरूपाचे इतर कोणतेही अधिकार कोणत्याही समजुतीने किंवा कोणत्याही स्वरूपाचा करार सदर मालमत्तेवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, इस्टेट किंवा हित असल्यास त्यांनी **रिझॉल्व्ह लॉ पार्टनर्स, वकील आणि सॉलिसिटर** त्यांचे कार्यालय - १२-ए, १ला मजला, ३१८ सत्यम इमारत, लिंकिंग रोड, खार पश्चिम, मुंबई ४०० ०५२ किंवा ईमेलवर: ahtesham@resolvelaw.in येथे सर्व सहाय्यक दस्तऐवजांच्या प्रतींसह येथे प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसांच्या कालावधीत कळविणे आवश्यक आहे, असे न केल्यास, अशा व्यक्तीचा दावा माफ केला गेला आणि/किंवा सोडला गेला आहे असे मानले जाईल.
**अनुसूची**
**(सदर मालमत्तेचे वर्णन)**
इम्पीरियल हाईट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, पत्ता - सीटीएस क्र.१ (भाग), गोरेगाव गावातील बेस्ट नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई-४०००६२ द्वारा जारी केलेले १० (दहा) पूर्णपणे भरणा केलेले समभागाकरिता दि.८ सप्टेंबर २०१९ रोजी भाग प्रमाणपत्र क्र.१२८ अंतर्गत विशिष्ट क्रमांक १२७१ ते १२८० आणि क्र.२८०२ असलेले निवासी फ्लॅट, टॉवर ए च्या २८ व्या मजल्यावर (मोजमाप क्षेत्र १३०.८९ चौ. मीटर १,४०९ चौ. फूट समतुल्य एमओएफए कार्पेट क्षेत्र) इम्पीरियल हाईट्स चे ४ पोडियम्स असलेली इमारत आणि प्लॉट बेअरिंग नं. २अ येथे ४४ वरचे मजले आहेत, सीटीएस क्र.१ (भाग) चे गाव गोरेगाव, बेस्ट नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० ०६२.
**आज दिनांकित १४ नोव्हेंबर २०२४ रोजी.**
**अहतेशाम एम. खत्री**
व्यवस्थापकीय भागीदार
**रिझॉल्व्ह लॉ पार्टनर्स,**
ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर

नवाकाळ
• पुणे । गुरुवार १४ नोव्हेंबर, २०२४ • पान - ८

# वसिम अक्रमच्या मांजरीचा ५५ हजारांचा हेअरकट



**कॅनबेरा -** पाकिस्तानचे माजी क्रिकेटपटू वसिम अक्रम हे सोशल मीडियावर एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आले आहेत. अक्रम यांनी आपल्या पाळीव मांजरीचा ऑस्ट्रेलियामध्ये हेअरकट करून घेण्यासाठी तब्बल ५५ हजार रुपये खर्च केले. अक्रम यांनी स्वत:च सोशल मीडियावर ही माहिती शेअर केली. मांजरीचा हेअरकट करण्याआधी त्याला गुंगीचे औषध देण्यात आले. त्याच्यावर देखरेख ठेवण्यासाठी प्राण्यांचे डॉक्टर, नर्स होते. हेअरकट करून झाल्यानंतर मांजराला त्यांनी चांगले खाऊ घातले. या एकूण सुविधा आणि हेअरकट याचा ५५ हजार रुपये खर्च आला असे सांगताना या पैशांमध्ये पाकिस्तानमध्ये दोनशे मांजरी सहज विकत घेता आली असती, असा टोला त्यांनी लगावला आहे.

## थोडक्यात...

### केंद्रीय वस्त्रोद्योग समितीवर सुनेत्रा पवार व धैर्यशील माने

**कोल्हापूर -** शिवसेना शिंदे पक्षाचे उपनेते, खासदार धैर्यशील माने यांची वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय वस्त्रोद्योग सल्लागार समितीच्या सदस्यपदी पुन्हा निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रातून सुनेत्रा पवार यांनाही या समितीवर संधी देण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय वस्त्रोद्योग समितीच्या सल्लागार सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीवर परराष्ट्र राज्यमंत्री पबित्र मार्घेरिटा, विधी व न्याय राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल, सूचना प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन आहेत.

### एमटीएनएलवरील कर्ज ३२ हजार कोटी रुपये

**मुंबई -** सार्वजनिक क्षेत्रातील महानगर टेलिफोन निगम लिमिटेड (एमटीएन ) या कंपनीवरील कर्जाचा बोजा सातत्याने वाढत चालला आहे. कंपनीचे एकूण कर्ज तब्बल ३२,०९७.२८ कोटी रुपयांवर गेले आहे. एमटीएनएलने शेअर बाजाराची नियामक संस्था सेबीला ही माहिती दिली आहे. एमटीएनएलने विविध बँका आणि वित्तीय संस्थांकडून ५ हजार ४९२ कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. व्याजासकट ही रक्कम ५ हजार ७२६.२९ कोटी रुपयांवर गेली आहे. यातील व्याजाची रक्कम २३४.२८ कोटी एवढी आहे. हे कर्ज एमटीएनएलने थकविले आहे. एमटीएनएलचे ढोबळ वार्षिक उत्पन्न ७९८ कोटी रुपये आहे. त्या तुलनेने कंपनीवर असलेले कर्ज वार्षिक उत्पन्नाच्या चाळीस पटीने जास्त आहे.

### लढणारा महाराष्ट्र होऊ, घरात बसणारा नाही!

**मुंबई -** दादर-माहीम मतदारसंघात महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाने जोरदार बॅनरबाजी केली आहे. या बॅनरवर 'लढणारा महाराष्ट्र होऊ, घरात बसणारा नाही, पोसणारा महाराष्ट्र होऊ, अन्याय सोसणारा नाही' असे लिहिले आहे. या बॅनरच्या माध्यमातून मनसेने ठाकरे गटाला डिवचले आहे.

### अमरावतीत कॅश व्हॅनमधून अडीच कोटींची रोकड जप्त

**अमरावती -** अमरावतीत रोकड वाहतूक करणारी दोन वाहने सिटी कोतवाली पोलिसांनी जप्त केली. या वाहनांमध्ये तब्बल अडीच कोटी रुपयांची रोकड असल्याची माहिती पोलिसांनी दिली.'रेडियंट कॅश मॅनेजमेंट सर्विस'या कंपनीची कॅश वाहतूक करणारी ही वाहने आहेत. जालन्यातील वाघरुळ येथेही पोलिसांनी एका चारचाकी वाहनातून ३ लाख ८२ हजार रुपयांची रोकड जप्त केली. या रकमेबाबत वाहन चालकाला विचारपूस केली असता समाधानकारक उत्तर न दिल्यामुळे पोलिसांकडून कारवाई करण्यात आली.

### सरकार शेतकऱ्यांशी खेळतंय अमोल कोल्हेंचा आरोप

**सांगली -** महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळत आहे. वन्य प्राण्यांचा उपद्रव होत असतानाही ती राज्य आपत्ती घोषित न केल्याने अनेक शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागल्याचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी म्हटले आहे. ते आज सांगलीत शिराळा विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार मानसिंग नाईक यांच्या प्रचारसभेत बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, मोदीजींना खूश करण्यासाठी सर्व्हे करून टीव्हीवर दाखवतात. सर्व्हे करायचा असेल तर महागाईचा सर्व्हे करा. सर्वसामान्यांनी बाईक खरेदी केली तर साडेअठ्ठावीस टक्के जीएसटी बसतो. पण एखाद्या उद्योगपतीने हेलिकॉप्टर खरेदी केली तर पाच टक्के जीएसटी बसतो, असा या सरकारचा अजब कारभार आहे.



आज अजित पवार यांच्या हेलिकॉप्टरमध्ये असलेल्या सामानाची तपासणी निवडणूक आयोग अधिकाऱ्यांनी केली तेव्हा बॅगेत चकली आणि डब्यात लाडू आढळले.

# राज्यात मविआला चांगले यश मिळेल! सचिन पायलटांना विश्वास

■ नागपूर

**महाराष्ट्रात** लोकसभा निवडणुकीत जे निकाल आले होते त्यापेक्षा अधिक चांगले निकाल विधानसभेत येतील व आमच्या महाविकास आघाडीला चांगले यश मिळेल, असा विश्वास राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते सचिन पायलट यांनी आज नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

यावेळी पायलट म्हणाले की, महायुती व भाजपाचे नेते निवडणुकीच्या अगोदर वन नेशन वन इलेक्शन, युनिफॉर्म सिव्हिल कोड, हिंदू मुस्लीम, मंदिर-मस्जिद असे मुद्दे उपस्थित करून लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचे काम करत आहेत. वास्तविक त्यांनी भविष्याचा वेध, विकासाचे धोरण, रोजगार, उद्योग, आरोग्य अशा मुद्यांवर बोलले पाहिजे. त्याऐवजी ते समाजात द्वेष निर्माण करणारी वक्तव्ये करत आहेत. लोकांसाठी कल्याणकारी योजना आखणे हे राज्याचे कामच असते. पण ऐन निवडणुकीच्या आधी काही योजना आणण्यामागील राजकारण जनतेला समजते.

एखादी योजना भाजपा-महायुती सरकारने आणली तर ते मोठे दानशूर आहेत असे दाखवतात. तीच योजना जर विरोधी पक्षांनी आणली तर त्याला ती रेवडी आहे, असे म्हणतात. हे योग्य नाही.

# फडणवीसांवर केस करणार खा. सुप्रिया सुळे यांचे वक्तव्य

■ मुंबई

**उपमुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्यावर केस करणार असल्याचे वक्तव्य राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केले.

खासदार सुळे म्हणाल्या की, आपण जेव्हा पद आणि गोपनीयतेची शपथ घेतो, राज्याच्या मुख्यमंत्रिपदी असतो तेव्हा फाईल दुसऱ्याला दाखवण्याचा अधिकार कोणाकडेच नसतो. ज्या व्यक्तीवर तुम्ही केस करता त्या व्यक्तीला बोलावून फाईल दाखवल्या जातात हे कितपत योग्य आहे? ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याच्या तपासाच्या फाईलवर सही तुम्ही केली. ज्या अजित पवारांवर तुम्ही आरोप केले, त्यांना बोलावून फाईल कशी दाखवली? घोटाळा झाला की नाही, यापेक्षा मुख्यमंत्र्यांनी फाईल दाखवलीच कशी? या प्रश्नाचे उत्तर हवे आहे. देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला फसवले आहे. फडणवीस यांना राज्याला उत्तर द्यावे लागेल.

# १९९१मध्ये शिवसेना फुटीमागे पवारच होते मंत्री छगन भुजबळ यांचा पलटवार

■ नाशिक

**छगन** भुजबळांनी आपली फसवणूक केली. त्यांनी कोणतीही मर्यादा शिल्लक ठेवल्या नसल्याचा आरोप शरद पवार यांनी केला होता. त्यांनी केलेल्या आरोपांना उत्तर देताना आज अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी सांगितले की, शरद पवार यांनीच १९९१ साली शिवसेना फोडण्याचे पुण्यकर्म केले. १९९१ साली मी एकटा शिवसेना फोडू शकत नव्हतो. ३६ लोकांची स्वाक्षरी झाल्यानंतर मी शेवटी गेलो.

शरद पवारांनी जाणीवपूर्वक माझ्यासह अजित पवार आणि आर. आर. पाटलांना मुख्यमंत्री



होऊ दिले नाही. राज्याचा मुख्यमंत्री झाल्यानंतर एखादा नेता वरचढ होऊ शकतो. हा अनुभव गाठीशी असल्यामुळे शरद पवार यांनी २००४ मध्ये मीच काय, आर. आर. पाटील आणि अजित पवार यांनाही मुख्यमंत्री केले नाही. कोणताही दोष नसताना मला तेलगी प्रकरणात गोवण्यात आले. तो अधिकाऱ्यांतील वाद होता. मला राजीनामा द्यायला लावला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मला नगरसेवक, महापौर केल्याबद्दल मी त्यांचे अनेकदा आभार मानले आहेत. बाळासाहेब माझी टिंगल करत होते. त्यावेळी मी त्यांच्याशी काहीकाळ भांडलो. पण नंतर जाऊन त्यांना भेटलो.

# एकनाथ शिंदे 'डील मास्टर' खा. संजय राऊत यांची टीका

■ मुंबई

**शिवसेना** ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची बॅग दोन वेळा तपासण्यावरून ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर पुन्हा एकदा निशाणा साधला. शिंदे हे महाराष्ट्राच्या राजकारणातील डिल मास्टर आहेत, अशी टीका राऊत यांनी केली. मोदी-शहांच्या दबावाखाली राज्यात फक्त विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या बॅगा तपासल्या जात आहेत. सत्ताधाऱ्यांचे पैसे अगदी पोलीस बंदोबस्तात जिथे पोहोचवायचे तिथे पोहोचले आहेत. पोहोचणारही आहेत. त्यावर काही बोलायचे धाडस शिंदे यांच्या अंगात नाही. त्यांनी आपल्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत धाडसाची कामगिरी केलेली नाही. त्यांना फक्त पैशाची सौदेबाजी करता येते. ते डिल मास्टर आहेत, असे राऊत म्हणाले. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकार उद्योगपती गौतम अदानी यांच्या सांगण्यावरूनच पाडण्यात आले, असा दावाही राऊत यांनी केला.

# बाकीच्यांचे वय बघता बारामतीचे सर्व मलाच बघायचे आहे!

**अजित पवारांचे वक्तव्य**

■ बारामती

**आगामी** काळात बाकीच्यांचे वय बघता मलाच या बारामतीचे सगळे बघायचे आहे, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. अजित पवारांनी बारामतीमधील ग्रामस्थांच्या भेटीगाठीवर भर देण्यास सुरुवात केली आहे. लोणी भापकर येथे ग्रामस्थांशी संवाद साधताना त्यांनी काका शरद पवारांवर टीकास्त्र सोडले. अजित पवार म्हणाले की, आगामी काळात बाकीच्यांचे वय बघता मलाच या बारामतीचे सगळे बघायचे आहे. मी निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन काम करत नाही. मी फुशारक्या मारत नाही, तर माझे काम सगळे सांगते. लोकसभेला जो निर्णय घ्यायचा होता तो तुम्ही घेतला. पण आताची निवडणूक माझ्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. लोकसभेला त्यांनी सांगायचे साहेबांची शेवटची निवडणूक आहे. सुप्रियाकडे लक्ष द्या. आता सांगतात साहेबांची शेवटची निवडणूक आहे नातवाकडे लक्ष द्या. आता हे अवघडच आहे. मी पण पुतण्या आहे ना? मुलगी झाली की थेट नातूच समोर आणला, मी पण मुलासारखाच आहे ना?

यावेळी त्यांनी बारामतीचे शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार पुतणे युगेंद्र पवार यांच्यावरही टीका केली.

# भाजपामुळे शेतकरी उद्ध्वस्त विजय वडेट्टीवारांचा आरोप

■ मुंबई

**भाजपामुळे** राज्यातील शेतकरी उद्ध्वस्त होत आहे, असा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. महायुतीच्या पायाखालची वाळू सरकत असल्याने ते कर्जमाफीच्या गोष्टी करत असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रसारमाध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, सरकार शेतकऱ्यांना दीडपट-दोनपट भाव दिल्याचे म्हणत आहे. हा भाव कुठे आहे? ज्यावेळी कापसाचे उत्पादन चांगले होते तेव्हा भाजपा सरकार कापसाच्या गाठींची आयात करते. सोयाबीनचे उत्पादन चांगले झाले की, सोयाबीन तेलाची आयात केली जाते. भाताचे उत्पादन वाढले तर निर्यात शुल्कात २५ टक्के ड्युटी लावली जाते. त्यांच्या या निर्णयामुळे त्यांना शेतकऱ्यांना जगवायचे की नाही, हेही लक्षात येत नाही. महाराष्ट्राच्या गादीवर खोटारडे लोक बसले आहेत.

# कोकणाचे अदानीकरण होऊ देणार नाही राणेंच्या बालेकिल्ल्यातून ठाकरेंचा इशारा

■ सावंतवाडी

**कोकणात** जे वाईट सुरू आहे, ते पाहवत नाही. कोकणाचे अदानीकरण होऊ देणार नाही, असा इशारा ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी



भाजपाला दिला आहे. उद्धव ठाकरे आज कोकण दौऱ्यावर होते. त्यांनी सावंतवाडीचे ठाकरे गटाचे उमेदवार राजन तेली यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. यावेळी त्यांनी केसरकर आणि राणे कुटुंबाचा चांगलाच समाचार घेतला.

उद्धव ठाकरे म्हणाले की, हे महाराजांचे भक्त आहेत. खरे तर हे महाराजांचे भक्त नाही तर डाकू आणि दरोडेखोर आहेत.

» पान ७ वर

### उद्धव ठाकरेंची गाडी अडवली पण अधिकारी क्षणात गायब

निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरे यांच्या बॅगांची वणी आणि औसा येथील हेलिपॅडवर तपासणी केली होती. त्यानंतर आज पुन्हा उद्धव ठाकरे गोव्यात विमानतळावर उतरुन गाडीने सिंधुदुर्गात प्रवेश करताना इन्सुली चेक पोस्टवर त्यांची गाडी अडवली होती. मात्र ज्या अधिकाऱ्याने गाडी अडवली, तो क्षणात तिथून गायब झाला. यावेळी उद्धव ठाकरेंनी गाडीची काच खाली केली. ते संतापलेले दिसले. भरारी पथकाच्या अधिकाऱ्यांनी ठाकरेंच्या गाडीची केवळ पाहणी केली. यानंतर त्यांचा ताफा पुढे सांवतवाडीसाठी रवाना झाला.

# मोहिली व्हिलेजचा हरित पट्टा रद्द करणार! मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

■ मुंबई

**मोहिली** व्हिलेजमधील हरित पट्टा रद्द करून येथील विकासाचा मार्ग मोकळा केला जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. महायुतीचे उमेदवार दिलीप लांडे यांच्या प्रचारसभेत बोलताना त्यांनी हे आश्वासन दिले. चांदिवली विधानसभा मतदारसंघातील हरित पट्ट्यामुळे या ठिकाणी विकास होत नाही. इमारती विकसित करताना या नियमाची अडचण होते. ही अडचण दूर करून तिथे विकासाला गती देण्यात येईल असे त्यांनी या सभेत सांगितले. या विषयावर गेल्या अडीच वर्षांत कधीही कसलीही चर्चा झाली नसताना मुख्यमंत्र्यांनी केवळ निवडणुकीत लोकांना भुलवण्यासाठी हे आश्वासन दिले नाही ना अशीही चर्चा होत आहे. हरित पट्ट्याच्या आरक्षणाला बगल देऊन महानगरपालिकेने या पट्ट्यात काही शाळांच्या इमारती बांधल्या आहेत. त्यामुळे हाच न्याय खासगी व गृहनिर्माण सोसायटींच्या इमारतींना का लावला जात नाही, असा सवाल स्थानिकांकडून विचारला जात आहे.

# नितीश कुमारांचा भरव्यासपीठावर नरेंद्र मोदी यांना पुन्हा चरणस्पर्श

■ पाटणा

**दरभंगा** एम्स रुग्णालयाच्या पायाभरणी सोहळ्याच्या व्यासपीठावर आज बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चरणांना स्पर्श केला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.



भाषण संपल्यानंतर नितीशकुमार खुर्चीवर बसण्यासाठी जात असताना मध्येच थांबले आणि खाली वाकून नरेंद्र मोदी यांना चरणस्पर्श करून त्यांना नमस्कार केला. त्यानंतर मोदी यांनी त्यांना आपल्या बाजूच्या खुर्चीवर बसवले. आपल्या भाषणात नितीशकुमार म्हणाले की, आमच्या अपेक्षेपेक्षा मोदी चांगले एम्स रुग्णालय बांधतील. २००३ मध्ये वाजपेयी यांच्या सरकारने दरभंगा येथे एम्स बांधण्याचा निर्णय घेतला होता. एम्सच्या बांधकामानंतर लोकांना फायदा होईल. या भागाचा विकास होईल. दरभंगा मेडिकल कॉलेजचाही विस्तार करणार असून, यामध्ये २५०० खाटांची व्यवस्था करणार आहोत.

# पंतप्रधान खोटारड्यांचे सरदार काँग्रेस अध्यक्ष खरगेंचा घणाघात

■ लातूर

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी खोटारड्यांचे सरदार आहेत, अशी घणाघाती टीका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केली. आज लातूर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस उमेदवार धीरज देशमुख यांच्या प्रचारार्थ खरगे उपस्थित होते.

मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, मोदी हे खोटारडे असून, त्यांनी दिलेली आश्वासने कधीच पूर्ण केली नाही. २०१४ च्या निवडणुकीवेळी काँग्रेस सरकारने देशाबाहेर ठेवलेला काळा पैसा परत आणून प्रत्येकाला १५ लाख रुपये देईन, असे आश्वासन दिले होते, ते पूर्ण केले नाही. मोदींनी शेतकऱ्यांना धोका दिला. शेतीमालाला दुप्पट भाव देणार होते. त्यांनी हमीभावाची रक्कम वाढवली नाही. ते शेतीमालाला दुप्पट भाव काय देणार? केंद्र सरकार जे आश्वासन देते ते पूर्ण करत नाही. ही नरेंद्र मोदी यांची खोड आहे. मोदींनी नोकऱ्यांचे आश्वासन दिले. पण तेही पूर्ण केले नाही. पंतप्रधान अशाप्रकारे खोटे बोलतात. ते खोटारड्यांचे सरदार आहेत.

**रिझर्व्ह बँकेने आपला रेपो दर हा मुख्य व्याजदर दोन वर्षांपासून ६.५ टक्के या उच्चांकी पातळीवर ठेवूनही महागाई नियंत्रणात येण्याची चिन्हे नाहीत. ऑक्टोबर महिन्यात किरकोळ किमतीवर आधारित महागाई दराचा भडका उडून तो ६.२१ टक्के या पातळीवर गेला आहे.**

# देशातील किरकोळ महागाईचा भडका! अन्नधान्याच्या दरात वाढ

■ नवी दिल्ली

रिझर्व्ह बँकेने ही महागाई चार टक्क्यांच्या आत रोखण्याचा संकल्प केला आहे. अन्नधान्याच्या किमती



१०.८७ टक्क्यांनी वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत डिसेंबरमध्ये व्याजदर कपातीची शक्यता मावळली आहे.

सप्टेंबर महिन्यात या महागाईचा दर ५.४९ टक्के होता. त्यामुळे ऑक्टोबर महिन्यातील पतधोरणात व्याजदर ६.५ टक्के या पातळीवर कायम ठेवण्यात आले होते. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात किरकोळ किमतीवर आधारित महागाईचा दर बऱ्यापैकी नियंत्रणात म्हणजे ४.८७ टक्के या पातळीवर होता. महागाईच्या आकडेवारीवरून स्पष्ट दिसून येते की, अन्न घटकाच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. एकूण महागाईतील अन्न घटकांची महागाई ऑक्टोबर महिन्यात वाढून १०.८७ टक्के या पातळीवर गेली आहे.

# मुंबईतील २ हजारहून अधिक मतदारांचे परदेशात वास्तव्य

■ मुंबई

**परदेशात** नोकरी किंवा व्यवसायानिमित्त किंवा निवृत्तीनंतर आपल्या मुलांकडे राहणाऱ्यांनाही राज्यातील विधानसभा निवडणुकीत मतदानाचा अधिकार आहे. मात्र तो अधिकार त्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहून बजावावा लागणार आहे. यावेळी परदेशात राहणाऱ्या मुंबईकर मतदारांची संख्या २ हजारांहून अधिक आहे. मुंबई शहरात अशा मतदारांची संख्या ४०७, तर उपनगरात १,८८१ एवढी आहे.

लोकसभा निवडणुकीत अनेक अनिवासी भारतीय फक्त मतदानासाठी मुंबईत आले होते. मात्र, मतदारयादीत नाव नसल्याने त्यांना मतदानापासून वंचित राहावे लागले. याची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी प्रशासनाने आधीपासून दक्षता घेतली आहे.

# गुजरातमधील महिला न्यायाधीशांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नसल्याने खेद

■ नवी दिल्ली

**गुजरातमधील** महिला न्यायाधीशांसाठी व कोर्टाच्या महिला कर्मचाऱ्यांसाठी पुरेशी स्वतंत्र स्वच्छतागृहे नसल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने खेद व्यक्त केला आहे. या महिला न्यायाधीशांना आपल्या वरिष्ठ पुरुष न्यायाधीशांच्या स्वच्छतागृहांचा वापर करण्यासाठी त्यांना विनंती करावी लागत आहे.

देशाच्या विकासाचे मॉडेल म्हणून गुजरात राज्याचा उल्लेख वारंवार होतो. मात्र या गुजरात राज्यातील महिला न्यायाधीशांची शौचालय नसल्याने अवस्था बिकट असून, त्यांची मोठी कुचंबणा होत आहे. काल सर्वोच्च न्यायालयात देशभरातील न्यायालयांमध्ये येणारे नागरिक, वकील, न्यायालयीन कर्मचारी यांच्यासाठीच्या स्वच्छतागृहांसंदर्भातील याचिकेची सुनावणी सुरू होती. न्यायमूर्ती जे.बी. पारदीवाला व न्यायमूर्ती पंकज मिथल यांच्या खंडपीठासमोर सुरू असलेल्या सुनावणी दरम्यान न्यायमूर्तींनी हा खेद व्यक्त केला. या संदर्भात सर्व उच्च न्यायालयाना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. न्यायालयाने म्हटले की, गेल्या वर्षी त्यांना गुजरातच्या एका न्यायमूर्तींचे पत्र आले होते ज्यात त्यांनी महिला न्यायमूर्तींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्याचे कळवले होते, असे न्यायालयाने यावेळी सांगितले.